दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -८४ | शनिवार दि.२९ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-84 | Saturday, Dt.29 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडच्या तुतारीकडे वरिष्ठ नेत्यांची पाठ, आता मतदारही दाखवणार वाट!

## राष्ट्रवादीचा उमेदवार चांगला पण यंत्रणेने केली घाण..!!





### वरिष्ठ नेता सोडा साधा खासदार सुद्धा प्रचाराला आला नाही..?

बीड नगराध्यक्ष पदासह ५२ नगरसेवकांच्या प्रचारासाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दस्तूर खुद्द शरद पवार साहेबांसह सुप्रियाताई सुळे, जयंत पाटील यासह मातब्बर नेत्यांपैकी आतापर्यंत एकही नेता आला नाही. हे वरिष्ठ नेते तर सोडा पक्षाचे स्टार प्रचारक सुद्धा बीडमध्ये प्रचारासाठी आले नाहीत. एवढेच नाही तर बीडचे खासदार सुद्धा आपल्याच पक्षाच्या उमेदवारांसाठी बीडमध्ये आतापर्यंत आले नाहीत. जर या नेत्यांनीच निवडणुकीकडे पाठ फिरवली असेल आणि पक्षाची यंत्रणा मिळत असलेल्या यशावर पाणी फिरवणारी असेल तर मतदार सुद्धा नाविलाजाने वाट दाखवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत.



बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये एकीकडे महायुतीची ताकद लोकसभा, विधानसभेमध्ये वाढत असताना बीडमध्ये मात्र शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मतदारांनी निस्वार्थ भावनेने साथ दिली. नेत्यांना खासदार केलं, आमदार केलं. आता कार्यकर्त्यांच्या अस्तित्वाची लढाई आली. त्यावेळी वरिष्ठ नेत्यांनी आजपर्यंत बीडकडे पाठ फिरवली आहे.आमदार संदीप भैया आणि माजी आमदार सय्यद सलीम जीवाचे रान करून एका चांगल्या दिलेल्या उमेदवाराला बळ देण्याचे प्रयत्न करत आहेत. मात्र त्यांच्या खाली असलेली यंत्रणा अकार्यक्षम असल्यामुळे एका चांगल्या नगराध्यक्षाच्या उमेदवारावर विपरीत परिणाम करत आहे. यामुळे दुखावलेला कार्यकर्ता आणि मतदार मतभेटीतून आपला राग व्यक्त केल्याशिवाय राहणार नाही यात शंका नाही.

बीड नगराध्यक्ष पदासाठी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पक्षाशी एकनिष्ठ असलेले, सामान्य जनतेच्या अडीअडचणीसाठी सदैव प्रामाणिकपणे उभे असलेले विष्णू भैया वाघमारे यांच्या सुविधा पत्नी सौ स्मिता वाघमारे या प्रामाणिक आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील योग्य सक्षम असलेल्या महिला उमेदवाराला संधी दिली. उमेदवार योग्य दिल्यामुळे आणि घडलेल्या काही अस्थिर राजकारणामुळे आंबेडकरी समाजाने देखील आपण कोणत्या पक्षात आहोत,कोणत्या विचारधारेवर आहोत हे बाजूला ठेवून,आपले राजकीय पक्षाचे जोडे बाहेर

(उर्वरीत पान २ वर)

### आंबेडकरी समाज प्रचारातून लांब...

अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आंबेडकरी चळवळीतील नेतृत्व रिपाईचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी डावलून आंबेडकर समाजावर अन्याय केला. या अन्यायामुळे तमाम आंबेडकरी समाजाने एकत्र येऊन अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर बहिष्कार टाकत या पक्षाच्या एकाही उमेदवाराला मतदान करायचं नाही असा ठाम निर्धार केला. एवढ्यावरच आंबेडकरी समाज थांबला नाही तर निवडणुकीत भूमिका घ्यावी लागेल शांत राहून जमणार नाही ? म्हणून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सौ स्मिता विष्णू वाघमारे यांना जाहीर पाठिंबा दिला. तमाम आंबेडकरी समाजाने पाठिंबा दिल्यानंतर त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करत आंबेडकरी समाजातील नेतृत्वाला प्रचारात आपल्या सोबत खांद्याला खांदा लावून घेत मतदारांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे अपेक्षित होतं.मात्र असं प्रत्यक्षात झालेलं आतापर्यंत दिसलं नाही. त्यामुळे पाठिंबा देऊन सुद्धा आंबेडकरी समाज व्यासपीठापासून वंचित असल्याचे चित्र दिसून येत आहे. याचा फटका देखील तुतारीच्या उमेदवाराला बसू शकतो हे नक्की.



## निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाची आढावा बैठक संपन्न

बीड /प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिनांक ०४.११.२०२५ रोजी थेट अध्यक्ष व सदस्य पदासाठी घोषीत केलेल्या प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदांमध्ये दिनांक ०२/१२/२०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत मतदान होणार असून दिनांक ०३/१२/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजलेपासून मतमोजणी पार पडणार आहे.

मा. श्री. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड यांनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान व मतमोजणीच्या अनुषंगाने पुर्व तयारीबाबत मा. नवनीत काँवत, पोलीस अधिक्षक, बीड यांचे समवेत जिल्हा स्तरावरील इतर पथक प्रमुख / नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, व पोलीस अधिकारी यांचा आज दिनांक २८.११.२०२५ रोजी बैठकीद्वारे आढावा घेण्यात आलेला आहे. सदर आढाव्यामध्ये मतदान व मतमोजणीसाठी निवडणूक निर्णय

(उर्वरीत पान २ वर)

# डॉ योगेश क्षीरसागरांच्या प्रचारात माजी नगराध्यक्ष डॉ. दीपाताईंची उणीव जनतेला खटकू लागली..!

## डॉ. योगेश भैय्या आपण पुरोगामी विचारांना धोका दिला मग जनतेला न्याय कसा देणार ?

बीड /प्रतिनिधी

राजकारणा सोबतच नाट्य, सांस्कृतिक, सामाजिक चळवळीचा चेहरा असलेल्या दीपाताई क्षीरसागर यांनी बीडच्या सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार लावला. त्या मात्र या वेळेच्या न.प. निवडणुकीच्या प्रचारापासून अलिप्त का ? बीडच्या विकासात या चळवळीचं महत्व नाही का ? स्व. काकूंच्या विचारधारे सारखीच सांस्कृतिक चळवळींना देखील मूठ माती देत झुंडशाहीला बळकटी द्यायचीय का ? स्वतःच्या स्वार्थासाठी पुरोगामी विचारांना धोका देऊन धर्मांध शक्तीला अचानक कसे स्वीकारले ? असे एक ना अनेक प्रश्न जनतेतून डॉक्टर योगेश भैय्या आपल्याला विचारले जात आहेत. याचे उत्तर आपल्याला द्यावे लागेल तरच जनता आपल्याला नगरपालिकेमध्ये संधी देईल अन्यथा विधानसभेची पुनरावृत्ती होईल यात शंका नाही.




योगेश भैय्या! तुम्ही काकूंच्या विचाराचे होणार नाहीत.तुम्हाला दीपाताईं सारखे सुसंस्कृत चेहरे नकोत ? मग तुम्हाला जनतेने का स्वीकारायचं ? तुमच्या हातात न प ची सत्ता देऊन शहर बकाल करायचं का ? ध्रुवीकरण करणाऱ्या पक्षाची स्वार्थासाठी तुम्ही धरलेली कास जनतेच्या पचनी का पडावी ? असे एक ना अनेक प्रश्न जनतेला पडू लागले आहेत. याचे समर्पक आणि समाधानकारक उत्तर जनतेला मिळाली नाहीत तर संतप्त जनता आपला राग मतपेटीतून व्यक्त केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. आणि जर असे झाले तर योगेश भैया पुन्हा एकदा हाता तोंडाशी आलेला घास आपल्याला विधानसभेची पुनरावृत्ती करणारा ठरू शकेल हे नाकारून चालणार नाही.

बीड शहर तसं सांस्कृतिक वारसा जोपासणारं आहे.डॉ. भारतभूषण क्षीरसागर व दीपाताई क्षीरसागर यांनी नाट्य, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक यासारख्या चळवळी राबवून बीडच्या सर्वांगीण विकासात मोलाचं योगदान दिलं.त्यामुळे या चळवळींच्या माध्यमातून बीडची नवी ओळख निर्माण झाली. नुसता शहराचा रस्ते ,नाल्यांचा विकासच नाही तर समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यशैलीचाच परिणाम म्हणून प्रत्येक वेळी न प निवडणुकीत डॉ. भारतभूषण यांना सर्वच पक्षाच्या आणि विचारांच्या वर्गांने डोक्यावर घेतलं. प्रचंड जनसंपर्क, व्यक्तिगत संबंधाच्या जोरावर जातीपाती, धर्माच राजकारण न करता विरोधकांनाही आपलंस करण्याची वृत्ती प्रत्येक निवडणुकीत त्यांना यश देत गेली. मात्र योगेश भैया तुम्ही स्व. काकूंच्या विचारधारेलाच मूठ माती दिली. पुरोगामी विचारांच्या पक्षात असताना सर्व जाती-धर्मातील लोकांनी अध्यक्षांच्या नंतर तुम्हाला नेतृत्व म्हणून स्वीकारलं या विश्वासाला आपण एका रात्रीत तडा दिला. विधानसभेची निवडणूक आपण लढवली आता स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची होती. मात्र तुमच्यासाठी ज्या कार्यकर्त्यांनी जीवाला जीव देऊन संघर्ष केला त्या कार्यकर्त्यांसाठी तुम्ही त्यांना तिकीट मिळावं म्हणून संघर्ष तर केलाच नाही पण त्यांना उघड्यावर टाकून पक्ष सोडून निघून गेलात तुमचा जयजयकार करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विरोधात तुम्ही उमेदवार कमळाची दिले कुठल्या नीतिमत्ता मध्ये असं राजकारण बसत मुस्लिम समाजाने भलेही विधानसभेत

(उर्वरीत पान २ वर)



## संपादकीय

# राष्ट्रीय चेतनेचा उदय

अयोध्येतील राम मंदिराच्या शिखरावर धर्मध्वज विराजमान झाला तो दिवस मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५. या भव्य मंदिरावर धर्मध्वज फडकवणे हा केवळ धार्मिक क्षण नाही, तर सनातन श्रद्धेच्या जागतिक प्रतिष्ठेचा पुरावा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करताच, 'जय श्री राम'च्या भावनिक जयघोषात उपस्थित विशाल जनसमूह हेलावला. धर्मध्वज फडकवण्याच्या ऐतिहासिक क्षणाने संपूर्ण अयोध्यानगरी भक्तीने भारावून गेली. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर, धर्मपाठासह, भाविकांमध्ये 'जय श्री राम'चा जयघोष दुमदुमला. हे केवळ मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचेच नव्हे, भारताच्या सांस्कृतिक जाणिवेचे प्रतीक होते. दुसऱ्या बाजूला हा क्षण पाच शतकांपासून चालत आलेल्या संघर्षाच्या सार्थकतेचे प्रतीक ठरतो. १५२८ मध्ये मोगल शासक बाबरचा सेनापती मीर बाकी याने प्रभू श्री रामचंद्रांच्या जन्मस्थानाचे पवित्र मंदिर उद्ध्वस्त करून त्यावर बाबरी मशीद बांधली. संघर्षाची बीजे रोवली गेली ती तेव्हापासूनच. तो संघर्ष केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी नव्हता, तर 'आस्था' आणि 'अनास्था' यांच्यातला होता. भारताच्या आत्म्यावरचे ते आक्रमण होते. श्री रामभक्तांनी तेव्हापासूनच रामजन्मभूमी मुक्त करण्यासाठी अविरत संघर्ष केला, प्रसंगी बलिदानही दिले. इतिहासातील नोंदीनुसार, या संपूर्ण काळात तब्बल ७६ मोठे संघर्ष झाले आणि असंख्य कारसेवकांचे, साधू-संतांचे रक्त सांडले. १८५३ मध्ये हिंदू-मुस्लीम समाजात यावरून पहिला मोठा वाद झाला. त्यानंतर १८८५ मध्ये महंत रघुबर दास यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ९० च्या दशकात विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखाली श्री रामजन्मभूमी आंदोलन उभे राहिले. 'श्री रामलला हम आयेंगे, मंदिर भव्य बनायेंगे' ही घोषणा देशव्यापी झाली. मग ६ डिसेंबर १९९२ ची घटना असो, वा त्यानंतरचा न्यायालयीन लढा; प्रत्येक टप्पा हा या यज्ञातील एका आहुतीसारखाच होता. ५०० वर्षांच्या संघर्षाचा निर्णायक क्षण आला तो ९ नोव्हेंबर २०१९ रोजी. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक आणि एकमताने निर्णय देत, वादग्रस्त जमीन श्रीराम मंदिराला देण्याचा स्पष्ट आदेश दिला. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते या भव्य मंदिराचे भूमिपूजन झाले आणि बांधकामाची सुरुवात झाली.

भगवान राम जन्मभूमीवर भव्य मंदिर बांधण्याची इच्छा पूर्ण होण्यास इतका कालावधी का लागला? त्याची अनेक कारणे आहेत. स्वातंत्र्यानंतर सर्वोच्च प्राथमिकता असूनही, संकुचित राजकीय विचारांमुळे ती दुर्लक्षित राहिली.

---

### जाहीर प्रगटन पेपर

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड
किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १७७५ / २०२५

CNR No. MHB102000038802025
शकुंतला भ्र. मधुकर पाटील व इतर ३ वि. निरंक
(मार्फत - ॲड. एस. व्ही. किंबहुने)

अर्जदार :--

१. शकुंतला भ्र. मधुकर पाटील, वय ७९ वर्ष, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर ता. जि. बीड
ह. मु. शिंदे नगर फेज-१, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड

२. रविंद्र पि. मधुकर पाटील, वय-५१ वर्ष, धंदा-व्यापार, रा. शिंदे नगर, फेज-१, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड

३. जगदिश पि. मधुकर पाटील, वय-४७ वर्षे धंदा-खाजगी नौकरी, रा. पिंपळनेर ता. जि. बीड

४. वर्षा भ्र. विलास उन्हाळे, वय-५० वर्षे, चंदा घरकाम, रा. वार्ड क. २, ब्राहण गल्ली, मंठा, ता. मंठा जि. जालना

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलग २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत मधुकर भाऊसाहेब पाटील यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत मधुकर भाऊसाहेब पाटील यांचा मृत्यु दिनांक १७/०८/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत मधुकर भाऊसाहेब पाटील यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०३/०१/२०२६

आज दिनांक २६ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

---



**धाराशिव - शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने परवीन खलिफा कुरेशी यांना उमेदवारी दिल्याबद्दल माजी नगराध्यक्ष खलिफा भाई कुरेशी यांचा सत्कार करताना माजी उपसरपंच आयुब भाई कुरैशी, पाशाभाई पठाण, खययुम कुरेशी आदी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९३८ दि.२५.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री नरसिंग पन्नु नांगलोत रा.कौचलवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सार्थक नरसिंग नांगलोत | मुलगा | १४.०१.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---



# नरेगा वर्ककोड डिलीट, लाभार्थ्यांसाठी तातडीने उपाय योजना करा - सतीश शेळके

बीड /प्रतिनिधी

नरेगा योजनेअंतर्गत राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व प्रकारच्या कामांचे वर्क कोड डिलीट झाल्याने लाभार्थ्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये कामे थांबली असून मजुरांना रोजगार मिळण्यात अडचणी येत आहेत. या गंभीर प्रश्नी तातडीने कार्यवाही करून निलंबित कामे सुरू करणे व मस्टर तात्काळ चालू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठीचे निवेदन वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिलदादा जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सतीश शेळके पाटील यांच्या वतीने मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री, मा.ना. श्री. भरतशेठजी गोगावले साहेब, मंत्री रोजगार हमी योजना यांनी मा. आयुक्त साहेब, नरेगा विभाग, नागपूर, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जि.प. बीड, मा. उपजिल्हाधिकारी साहेब (रोहयो), बीड, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब (पंचायत), जि.प. बीड सत्वर कार्यवाहीसाठी आदेशीत केले आहे.

तसेच गटविकास अधिकारी श्री.राठोड साहेब यांनी लाभार्थ्यांना महत्त्वाची सूचना दिली आहे. कामांच्या पुनर्मंजुरीसाठी (दुबार वर्क कोड) मूळ संचिका व चालू तारखेचा ७/१२ उतारा घेऊन तातडीने पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले.राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व गावांना वर्क कोड डिलीट होण्याचा मोठ्या प्रमाणात फटका बसला असून पुनर्मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मस्टर तात्काळ सुरू करण्याची मागणी निवेदनात स्पष्टपणे करण्यात आली. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे लवकरात लवकर जमा करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४९६ दि.२८.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गणेश सांडु चुंगडे, रा.कौचलवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **आई** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कमलाबाई सांडु चुंगडे | आई | ०१.०६.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२९१ दि.२८.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गणेश सांडु चुंगडे, रा.कौचलवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सांडु गुडूसिंग चुंगडे | वडील | २२.०२.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४१९ दि.२५.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री भाऊसाहेब मोतीराम राठोड, रा.राहुवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अतुल भाऊसाहेब राठोड | मुलगा | १०.०५.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९३९ दि.२५.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री नरसिंग पन्नु नांगलोत रा.कौचलवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विराज नरसिंग नांगलोत | मुलगा | २६.१२.२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

पान १ वरुन...

**बीडच्या तुतारीकडे ...**

ठेवून केवळ उमेदवार पाहून सौ स्मितताताई वाघमारे यांना विना अट जाहीर पाठिंबा दिल्यामुळे शरद पवारांच्या तुतारीचे पारडे बीड नगराध्यक्ष पदासाठी पर्यायने खाली नगरसेवकांसाठी सुद्धा बळ देणारे ठरले. आयत्या आलेल्या संधीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आतापर्यंत सोनं करणं अपेक्षित होतं. मात्र प्रत्यक्षात तसे घडताना दिसून येत नाही आजही तुतारीचा प्रचार करताना केवळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार संदीप भैया क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम आणि आपल्या सोयीनुसार फिरत असलेले जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्याशिवाय चौथा चेहरा नेतृत्व म्हणून सभेला, कॉर्नर बैठकांना दिसून येत नाही. हे वास्तव नाकारून चालणार नाही. मतदार, कार्यकर्ता स्वतःहून तुतारीच्या विजयासाठी वन वन भटकत आहे मात्र त्यांना योग्य दिशा देणारी यंत्रणाच अकार्यक्षम असल्यामुळे या उत्साहावर पाणी फिरत आहे. कुचकामी यंत्रणेमुळे विजयाच्या उंबरठ्यावर असलेल्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अति आत्मविश्वास कदाचित नडण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभा,विधानसभेत यश मिळाल्यानंतर आता उंबरठ्यावर आलेला विजय देखील अकार्यक्षम यंत्रणेमुळे पदरात पाडून घेण्यामध्ये बीडची राष्ट्रवादी अपयशी ठरते का ?अशी चर्चा होत आहे. प्रत्यक्ष मतदानाला अवघे दोन दिवस शिल्लक आहेत, या कमी कालावधीमध्ये तरी नेतृत्वाला आणि अकार्यक्षम यंत्रणेला आपल्यामध्ये काही सुधारणा करता येईल का ? आणि उंबरठ्यावर असलेल्या विजयाला आपल्या पदरात पाडून घेता येईल का ? हे येणारा काळच नव्हे तर यांची वागणूक ठरवेल.

**निवडणूक निर्णय....**

अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाची संपूर्ण तयारी झालेली असून त्याबाबत मा. जिल्हाधिकारी महोदय, यांनी समाधान व्यक्त केले.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या इमारतीपासुन १०० मीटर अंतरापर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार मतदान केंद्रावर मतदान सुरु झाल्यापासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मनाई आदेश लागू असल्यामुळे मतदानासाठी येणा-या मतदाराशिवाय अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मतदानासाठी येणा-या मतदारांनी मतदान केंद्राचे बाहेर १०० मीटर अंतरापर्यंत / परिसरामध्ये कोणत्याही व्यक्तिने मोबाईल फोन, (बंद/एअरोप्लेन मोडवर असला तरीही) कॉर्डलेस फोन, वायरलेससेट इत्यादी, बाळगणे, वापरणे अथवा मतदानाच्या गोपनियतेचा भंग होईल अशी कृत्य करणे करण्यास बंदी/मनाई आहे. (निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी व निवडणूक कामाशी निगडित कर्मचारी वगळून.)

पान १ वरुन...

मतदान केंद्रातील मतदार प्रतिनिधी व इतर प्रतिनिधी यांनी मतदान केंद्रामध्ये मोबइल वापरणे किंवा फोटो काढणे अथवा चित्रीकरण करणे तसेच मतदानाच्या गोपनियतेचा भंग होईल अशी कृत्य करण्यास बंदी/मनाई आहे.

मतदान केंद्रापासुन १०० मीटर अंतराच्या बाहेर राजकिय पक्ष / उमेदवार यांनी उभारलेल्या तात्पुरत्या बुथवर (कार्यस्थळ) कोणतेही भिंतीपत्रक, ध्वज, चिन्ह व इतर प्रचार साहित्य लावता येणार नाही.


**डॉ योगेश क्षीरसागरांच्या...**

पक्षी आणि जातीय समीकरणांमध्ये बहुमताने मतदान केलं नसेल मात्र तुमच्या प्रती असलेली सहानुभूती हे निश्चित होती मात्र ती सहानुभूती आणि त्यांच्या मनात असलेलं प्रेम आपण एका झटक्यात तोडून टाकलं हे कसलं राजकारण. तुमच्या या निर्णयाने कार्यकर्ते तर अचंबित झालेच मात्र या निर्णयानंतर तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून या बीड नगरीच्या यशस्वी नगराध्यक्ष म्हणून राहिलेल्या कर्तबगार प्राचार्य डॉक्टर दीपाताई क्षीरसागर आपल्या सोबत प्रचारामध्ये दिसतील ही रास्त अपेक्षा होती. मात्र दीपाताई प्रचारात तर कुठे नाहीतच परंतु साधा त्यांचा फोटो सुद्धा आपल्या कोणत्याही बॅनरवर दिसत नाही. आपल्या आईचाच फोटो आपल्या बॅनरवर नाही तर या बीड नगरीला विकासाचे मातृत्व तुम्ही कसं देऊ शकणार ? तुमच्या कौटुंबिक समस्या असू शकतील मात्र निवडणुकीत आपण जेवढ आपल्या पत्नीला स्थान देत आहात त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक स्थान आईला हवं होतं असं आम्ही नाही तर सामान्य जनता म्हणत आहे याचे उत्तर आपण काय देणार ?

सामाजिक शैक्षणिक राजकीय ,नाट्य, सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून शहराच्या विकासाला चालना मिळत असते त्या चालनेला खंडित करायचं काम होत असल्याचं दिसू लागल आहे. नुसतं काँक्रेट जंगल तयार करून शहराचा विकास होत नसतो, तर क्रियाशील समाज निर्मितीतूनच शहरं आपली ओळख निर्माण करतात याचा विसर पडल्यानेच डॉ. दीपाताई क्षीरसागर यांना प्रचारा पासून अलिप्त ठेवण्याचं काम केलं जाऊ लागल आहे का ? त्यामुळे बुद्धिवादी वर्गामध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून याचा फटका निवडणुकीत बसणारच असं राजकीय विश्लेषक सांगू लागले आहेत. शेवटी तो तुमचा घरचा विषय आहे पण बीडच्या जनतेला दीपाताईंची अनुपस्थिती खटकू लागली आहे. त्यातच दीपाताई क्षीरसागर यांनी कधीच निवडणूक काळात मर्यादा भंग होईल अशी भाषा वापरली नाही. मात्र त्यांना सारिका क्षीरसागर यांना मर्यादांचे भान ठेवा असा सल्ला द्यावा लागला. हे बीडच्या सांस्कृतिक अध: पतन कसं होणार आहे याचा नमुना ठरणार उदाहरण नाही का ?

---

# सन-२०२६-२७ साठी नियोजनचा आराखडा वेळेत सादर करा- जिल्हाधिकारी जॉन्सन



बीड /प्रतिनिधी

जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०२६-२७ साठीचे परिपूर्ण नियोजन आराखडे सर्व यंत्रणांनी १५ डिसेंबर २०२५ पूर्वी सादर करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे दिले.समितीच्या कामकाजासाठीची आढावा बैठक आज त्यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन समिती सभागृहात झाली. यावेळी विविध यंत्रणांचे दायित्व तसेच चालू वित्तीय वर्षातील कामांची प्रगती यांचा आढावा घेण्यात आला. जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे तसेच सामजिक न्याय विभागाचे उपायुक्त प्रदीप भोगले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यंत्रणांनी यापूर्वीच्या कामाच्या दायित्वाबाबत तातडीने घालून लक्ष घालून ती कामे पूर्ण करावित असे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की नियोजन विभागाची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. ज्या विभागांनी तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेतली आहे त्यांनी तात्काल प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव सादर करावेत.सर्व विभागांनी तझऊ- नसेच चक णखऊदेखील तत्काळ पूर्ण करावे त्यासोबतच पुढील काळात गतिमान पद्धतीने काम होण्याच्या दृष्टीकोणातून ख- झरी आता मोबाईल ॲप्लीकेशन उपलब्ध करून देण्यात आले आहे हे ॲप्लीकेशन सर्वांनी गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करावेत आणि आगामी काळात सर्व प्रस्ताव डिजिटल पद्धतीने सादर करावेत अशी माहिती नियोजन अधिकारी डॉ. चिंचाणे यांनी दिली. यंत्रणांनी आगामी वर्षासाठीचे प्रस्ताव सादर करताना ते परिपूर्ण असतील याची खबरदारी घ्यावी. तसेच झच् गतीशक्ती अंतर्गत आवश्यक, लॉगीन तयार करावी या कामासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नेमण्यात यावेत अशी सूचना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी यावेळी दिली.बैठकीच्या आयोजनासाठी सहा नियोजन अधिकारी राधाकिशन इधारे व त्यांच्या सहका-यांनी परिश्रम घेतले.

# परळीतल प्रत्येक गल्ली आणि प्रत्येक वस्तीच्या विकासाची आमच्याकडे ब्ल्यू प्रिंट तयार - आ.धनंजय मुंडे

## आजपर्यंत प्रत्येक सुखदु:खात काम करत आलोय; अविरतपणे पुढेही काम करत राहण्याचा शब्द

धनंजय मुंडे यांना टार्गेट करून बहुजन समाजाचे नेतृत्व संपवण्याचा डाव परळीकरांनी हाणून पाडावा- प्रा सुनील मगरे

परळी /प्रतिनिधी

परळी शहरातील प्रत्येक गल्ली आणि प्रत्येक वस्त्यांची विकासाची ब्ल्यू प्रिंट आपल्याकडे असून त्या दृष्टिकोनातून सर्व ती पायाभूत कामे आपण केलेली आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखात सर्वात आधी धावून जाण्याचे काम आपण केलेले आहे. अडचणीच्या काळात सर्वात आधी आपले नाव लोकांना आठवते हा आशीर्वाद मिळालेला आहे. त्यामुळे विकासाची ही गंगा अधिक प्रभावी करण्याचा आपण प्रयत्न करणार असून आपण महायुतीच्या पाठीशी भक्कम उभे राहा असे आवाहन आ. धनंजय मुंडे यांनी शिवाजीनगर येथील कॉर्नर सभेत केले. तर यावेळी धनंजय मुंडे यांना टार्गेट करून बहुजन समाजाचे नेतृत्व संपवण्याचा डाव परळीकरांनी हाणून पाडावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी केले.

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व प्रभाग क्रमांक १० व प्रभाग क्रमांक १ साठी ही कॉर्नर सभा झाली.दहा चे उमेदवार डावरे सरोजा गौतम, प्रभाग क्रमांक दहा ब चे उमेदवार मुंडे महेश गोविंदराव व प्रभाग क्रमांक दहा च्या उमेदवार चाटे कुसुम आण्णासाहेब तर प्रभाग क्रमांक १ अ चे उमेदवार आघाव वंदना अश्विनकुमार, ब चे उमेदवार मुंडे दीपक प्रल्हादराव यांच्या प्रचारार्थ आ.धनंजय मुंडे यांची कॉर्नर सभा झाली. या सभेला प्रचंड संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. कॉर्नर बैठक असतानाही अलोट गर्दीने एखाद्या जाहीर सभेचे रूप यावेळी बघायला मिळाले.

यावेळी पुढे बोलताना आ. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, या भागातील विविध विकासाची कामे आपण केलेली आहेत. अनेक



योजना देण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. अशोकनगर मधील महानिर्मितीची जागा स्थानिकांना देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या नावाने पी टी आर करून दिले. एका महिन्याच्या आत स्थानिकांना जागा देऊन त्यांचे पीटीआय त्यांच्या हातात दिले. मराठवाड्यामध्ये सर्वाधिक घरकुल परळीत मंजूर करण्यात आलेली आहेत.

त्याचबरोबर चेंबरी रेस्ट हाऊस शेजारचा ६० फुटी रस्ता त्याचेही काम सुरू झाले असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. संबंध परळीकरांच्या अनेक दिवसांच्या मागणीनुसार ६५ कोटी रुपयांचे क्रीडा संकुल आपल्या परळीमध्ये उभे राहत आहे. उच्च शिक्षण, रोजगार निर्मिती आणि भौतिक सुविधा या परिपूर्ण करून परळी शहराला अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न आपण केला आहे.

अशोकनगर व परिसरात सहा कोटींचे रस्ते केलेले आहेत. बौद्ध विहाराचे कामाचे भूमिपूजन झाले असून लवकरच ते पूर्ण होणार आहे. येत्या वर्षभरात रेल्वेचा दुहेरी पूल उभारण्याचे काम सुरू करणार असून संत रोहिदास महाराज मंदिर व अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने दोन सभागृह जागेसह या ठिकाणी आपण देणार आहोत. वाल्मिकी समाजाचे सभागृह व कंपाऊंड वॉलचे कामही लवकरात लवकर पूर्ण होणार आहे. रेल्वे लाईनच्या दुहेरीकरणात जी घरे उठणार होती ती आपण स्थगित केली. विकास नक्कीच होईल परंतु रेल्वे मार्गामुळे कोणाचे नुकसान होणार याची काळजीही आपण घेतली. विकासाच्या अजेंडा घेऊनच आपण परळीकरांसमोर आलो आहोत. परळीच्या सर्वांगीण विकासाची संपूर्ण ब्ल्यू प्रिंट आमच्याकडे आहे. हा विकास अधिक गतिमान करण्यासाठी या नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह सर्वच्या सर्व महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना सामाजिक न्याय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा.सुनील मगरे यांनी सांगितले की, बहुजन समाजाचं बुलंद नेतृत्व म्हणजे आ. धनंजय मुंडे आहेत. मात्र कोणत्या ना कोणत्या कारणावरून जाणीवपूर्वक धनंजय मुंडे यांना टार्गेट करून बहुजन समाजाचे हे नेतृत्व संपवून टाकण्याचा डाव काही मंडळींनी हाती घेतला आहे. गेल्या काही दिवसापासून या नेतृत्वाला बदनाम करून संपवण्याचा चंग काही शक्तींनी मांडला आहे. मात्र त्यांना ते शक्य होणार नाही. बहुजन समाजाचे हे नेतृत्व टार्गेट करून संपवण्याचा हा डाव मोडून करण्याची संधी आपल्याला आहे. त्यामुळे या नगरपालिका निवडणुकीत आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या ताब्यात ही नगरपरिषद द्या आणि आपल्या नेतृत्वाला संपवण्याचा जो डाव आखण्यात आला आहे तो हाणून पाडा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय आघाडीचे प्रदेश अध्यक्ष प्रा. सुनील मगरे ,जुगलकिशोर लोहिया, अजय मुंडे ,माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी ,निळकंठ चाटे, रवींद्र परदेशी, तुळशीराम पवार, डॉ. सूर्यकांत मुंडे, सचिन कागदे, भीमराव पवळे, डॉ. संतोष मुंडे, प्रा.डॉ. विनोद जगतकर, गोविंद मुंडे ,किशोर पारधे ,दिनेश गजमल, बालासाहेब चाटे, प्रल्हाद सुरवसे, किशन बुंदिले, दीपक मुंडे, नाझरभाई छोटू इराणी ,प्रकाश कावळे, पप्पू नेटके, भीमराव डावरे गौतम डावरे, रघुनाथ डोळस, शिवा बडे यांच्यासह पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीच्या पद्मावती भागात धनंजय मुंडेंचा प्रचाराचा झंजावात

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - परळी वैजनाथ शहरातील पद्मावती भागात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंजावात पहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी पायी रॅली द्वारे प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांच्या भेटी घेत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवार सौ. उषा किशोर केंद्रे तसेच सचिन रामनाथ सारडा यांना मतदान करण्याचे आवाहन श्री. मुंडे यांनी नागरिकांशी संवाद साधत केले.

दरम्यान धनंजय मुंडे यांच्या या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला,



**पायी रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, घरोघर स्वागत**

अगदी घरोघर त्यांचे स्वागत - सत्कार करण्यात आले. विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असलेल्या परळी शहराला संपूर्ण विकसित करण्याचा आपला अजेंडा असून, यासाठी परळीकर नागरिक संपूर्ण ताकतीने आमच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास यावेळी मुंडेंनी व्यक्त केला. यावेळी जुगलकिशोर लोहिया, विजय भोईटे, शंकर आडेपवार, दीपक तांदळे, योगेश जाजू, दीपक कुलकर्णी, शाम तोष्णीवाल, उमेदवार सचिन सारडा, किशोर केंद्रे, नितीन आडेपवार, सचिन स्वामी, राम पेंतेवार, मयूर मुलजकर, ओंकार भोईटे, संतोष घोडके, सय्यद शेरू, राजू भाई, बापू गायकवाड, गंगाराम वाघमारे, शिवा होके, फिरोज भाई यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# परळी नगरपरिषद निवडणुक: महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे मैदानात

परळी /प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीत आज सकाळपासूनच सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध भागात प्रचार दौरा केला. या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नागरिकांनी विशेषतः महिलांनी त्यांचे आत्मीय स्वागत करत वहिनी महायुतीच विजय होणार अशी खात्रीच राजश्रीवहिनी यांना दिली.आमच्यावर परळीकर जनतेचे प्रचंड प्रेम असून या प्रेमाला उतराई होण्यासाठी केवळ विकास आणि विकासच करू असा शब्द सौ. राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी ठिकठिकाणी बोलताना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व परळी शहरातील विविध प्रभागात महायुतीच्या वतीने अधिकृत उमेदवारी देण्यात आलेल्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे या स्वतः मैदानात उतरल्या असून आज पासून त्यांनी आपल्या प्रचार व जनसंपर्क दौऱ्याला सुरुवात केली. यामुळे परळीत प्रचंड चैतन्य निर्माण झाले आहे. आज शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून प्रभाग क्रमांक सहा मधून या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्यासह या प्रभागातील उमेदवार बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव यांच्यासह

पदाधिकारी उपस्थित होते. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांची परळी शहरातील नागरिकांशी घट्ट नाळ जोडलेली असून त्यांचा मोठा जनसंपर्क आहे याची प्रचिती या दौऱ्यातही बघायला मिळाली. या आधीही त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सक्रिय सहभाग घेत प्रचाराचा झंझावात निर्माण केला होता. त्याच पद्धतीने नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठीही सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे स्वतः मैदानात उतरल्या आहेत.



यावेळी नागरिकांच्या गाठीभेटी घेत परळी नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाला व सर्व नगरसेवक पदाला महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहर महायुतीच्या बाजूने कायमच राहिले आहे. आमच्यावर लोकांनी प्रचंड प्रेम केलेले आहे. साहेब व ताई यांच्या बाजूनेच आजचेही वातावरण आहे. त्यामुळे येथे विकासावरच मतदान होईल.साहेबांवर लोकांचे प्रेम आहे कारण जसं साहेबांना कळतंय तसं साहेबांनी परळीचा विकास, विकास आणि विकासाच केलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्षपदासह सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील. साहेब व ताई या दोघांच्या पाठीशी परळी नक्की आपल्या आशीर्वाद उभे करणार याची आपल्याला खात्री आहे. तमाम परळीकरांनी महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, विकासाला आम्ही कुठेही कमी पडणार नाही अशी ग्वाही सौ .राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी दिली.

# अंबड प्रभाग ७ मध्ये बदलाचं वादळ शेख फेरोज (अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली

## जुन्या राजकारणाचा अध्याय संपुष्टात

अंबड /प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या रणशिंगात प्रभाग क्रमांक ७ आज एक रणांगण बनला आहे. चाळीस-पन्नास वर्षांपासून प्रभागावर गादीसारखी बसलेली जुन्या राजकीय गटाची सत्ता लोकशक्तीसमोर कोसळताना दिसत आहे. जनता या वेळी सज्ज आहे.आणि बदलाचं नेतृत्व एका नावाभोवती एकवटत आहे शेख फेरोज (अध्यक्ष)

प्रभाग ७ मध्ये चाललेली ही लोकचळवळ फक्त राजकीय नाही ती जनतेचा रोष पिळवणुकीचा कंटाळा आणि विकासासाठीचा जाज्वल्य निर्धार यातून जन्माला आलेली आहे. नावापुरते विकासाचे आश्वासन देत दशकानुदशके लोकांची दिशाभूल करणाऱ्या जुन्या गटाविरुद्ध जनतेने आता उघड बंड पुकारले आहे.

शेख फेरोज (अध्यक्ष) बदलाचा झंझावात

शेख फेरोज हे फक्त एक उमेदवार नाहीत ते प्रामाणिक नेतृत्वाचं आश्वासन आणि नव्या युगाचा विश्वास म्हणून प्रभाग ७ मध्ये उभे राहत आहेत.



त्यांच्या आक्रमक,प्रगल्भ आणि पारदर्शक नेतृत्वशैलीमुळे सर्व समाजघटकांमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. प्रभागातील तरुणाई, महिला, कामगार, व्यावसायिक सर्वांच्या आशा त्यांच्या नेतृत्वाशी जोडल्या गेल्या आहेत.

जनता म्हणते आता बस्स जुन्या गटांनी प्रभागाला दिले काय ? न संपणारी वचने अनुत्पादक कारभार भ्रष्ट व्यवस्थेमुळे विकासाला कायम ब्रेक याच जडत्वाचा अंत करण्याची वेळ आल्याचं मतदार थेट आणि ठामपणे नोंदवताना दिसत आहेत.बदल हवा आहे बदल आम्हीच घडवणार असा भाव मतदारांमध्ये स्पष्ट उमटतोय.

शेख फेरोज (अध्यक्ष) यांच्या विजयाचा सूर आधीच घुमू लागलाप्रभाग ७ मध्ये शेख फेरोज यांच्या डोर-टू-डोर मोहिमांना आणि संवाद यात्रांना मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पाहता आगामी विजयाचे मजबूत संकेत मिळत आहेत.लोकांच्या मनात फक्त एकच मागणी

विकास,जबाबदारी आणि शंभर टक्के प्रामाणिकपणा प्रचाराचा मुख्य संदेश पिढ्यान्पिढ्या बसलेल्या गटांनी प्रभागाची स्थिती बदलली नाही. आणि प्रभागातील लोकांच्या भेटी घेऊन काय समस्या आहे हे सुद्धा जाणून घेत नाही फक्त निवडणूक आली की दादा,मामा,काका,भाऊ आणि पाहुणे यांना घेऊन प्रभागात फिरतात आणि विकासाच्या मोठाल्या गप्पा मारतात पण आता नवीन नेतृत्व,नव्या विचारांची गरज आहे. विकासासाठी, स्वच्छ राजकारणासाठी आणि उत्तरदायित्वासाठी जनता एकजूटीने उभी आहे.

### प्रभाग ७ मध्ये सुरू नवीन युगाची पहाट

शेख फेरोज (अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली प्रभागात बदलाचे वारे नव्हे तर वादळ उठले आहे. हा फक्त राजकीय बदल नाही, तर प्रभागाच्या सामाजिक, आर्थिक आणि विकासात्मक भविष्यासाठी सुरू झालेला ऐतिहासिक प्रवास आहे. तरुणाईचा जोश,महिलांचा विश्वास,ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि सर्व समाजघटकांचा उत्स्फूर्त सहभाग प्रभाग ७ आज खऱ्या अर्थाने परिवर्तनाच्या दिशेने पुढे जात आहे.

# प्रभाग क्र.४ मध्ये राष्ट्रवादीचा सलमान यांचे घड्याळ तुफान

## धडाकेबाज अजेंडामुळे तांबोळींची जोरदार आघाडी निश्चित

अंबड /प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीतील प्रभाग क्र.४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित दादा पवार) गटाचे ओबीसी उमेदवार सलमान तांबोळी यांनी प्रचारात अक्षरश धुमाकूळ घातला आहे.त्यांची आक्रमक शैली थेट जनसंवाद आणि कृती वर भर देण्याच्या आश्वासनामुळे मतदारांकडून त्यांना प्रचंड व अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

प्रभाग क्र.४ मध्ये तांबोळींनी मोठी संधी निर्माण केली असून त्यांची आघाडी निश्चित मानली जात आहे.

जुने राजकारण हद्दपार कृतीचा निर्धार सलमान तांबोळी यांनी केवळ औपचारिक प्रचार न करता प्रत्येक गल्लीबोळात आणि घरोघरी जाऊन लोकांशी झटपट संवाद साधला. नागरिकांच्या समस्या प्रामाणिकपणे समजून घेऊन त्यांवर त्वरित उपाययोजना करण्याचा विश्वास त्यांनी दिला आहे.त्यांनी जुन्या आश्वासनांवर आधारित राजकारणावर आक्रमकपणे टीका करत जनतेला आश्वासन नव्हे तर कृती देण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे.त्यांच्या या धडाकेबाज आणि झुंजार नेतृत्वामुळे प्रभागात एक वेगळेच वातावरण तयार झाले आहे.

मुख्य अजेंडा पाणी पुरवठा आणि महिला



सुरक्षा

तांबोळी यांनी आपल्या प्रचारात दोन प्रमुख मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवले आहे, जे प्रभागातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत पाणी पुरवठा प्रभागाला वर्षानुवर्षे भेडसावणारा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी ते वचनबद्ध आहेत.पाण्यासाठी आता संघर्ष नाही तर फक्त समाधान हा त्यांचा नारा आहे.महिला सुरक्षा: प्रभागातील महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष लक्ष देण्याचा त्यांनी जाहीर केले आहे.महिला मतदारांचा विश्वास त्यांनी एका महत्त्वाच्या राजकीय मुद्द्याप्रमाणे मिळवला असून निवडून आल्यानंतर महिला सुरक्षेसाठी तातडीने कृती करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

### राजकीय निरीक्षकांचे मत: आघाडी निश्चित

सलमान तांबोळी यांच्या आश्वासक आणि कामावर आधारित दृष्टिकोनामुळे मतदार त्यांच्यावर विश्वास ठेवत आहेत. स्थानिक राजकीय निरीक्षकांच्या मते, तांबोळींची विकासासाठीची तीव्र इच्छाशक्ती आणि धडाकेबाज जनसंपर्क यामुळे प्रभाग क्र.४ मध्ये त्यांची विजयी आघाडी निश्चित आहे. जनता त्यांच्या कामावरील दृष्टिकोनामुळे विश्वासार्हतेने त्यांना समर्थन देत आहे.तांबोळींच्या 'राष्ट्रवादी' इंजिनने प्रभाग क्र.४ मध्ये प्रचाराची दिशी आणि दशा दोन्ही बदलली असून, मतदानाची रणधुमाळी आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे.

# बीड न.प.वर राष्ट्रवादी व शिवसेना आघाडीचा झेंडा फडकवा

## तालुकाप्रमुख गोरख सिंघन

बीड /प्रतिनिधी

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिताताई विष्णु वाघमारे हया गेल्या ३० वर्षांपासून न.प. मध्ये काम करतात. त्यांना खुप मोठा अनुभव आहे. यामुळे लोकांची पसंती मोठ्या प्रमाणावर आहे, मायबाप मतदार बंधु भगिनींनो या सर्व बाबींचा विचार करून येणाऱ्या २ डिसेंबर रोजी मशाल व तुतारी या चिन्हासमोरील बटन दाबुन न.प. वर आपल्या हक्काची व सर्वसामान्य असलेली माणसं मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन शिवसेनेचे बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले आहे.



येत्या २ डिसेंबर रोजी बीड न.प. मधील सर्व प्रभागातील व नगराध्यक्ष पदाचे मतदान होत आहे,प्रचार यंत्रणा हि अंतिम टप्प्यात आली असून, शहरात सर्वत्र तुतारी व मशाल यांचाच बोलबाला बघायला मिळत असुन मतदारांनीच हि निवडणूक हातात घेतली आहे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब व शरदचंद्र पवार यांच्या विचारांवर लोकांचा विश्वास आहे,तसेच स्थानिक आमदार संदिप भैय्या क्षीरसागर यांच्या कामाची पध्दत व रात्रीबेरात्री कुणाच्याही मदतीला धावून जाणारा सर्वसामान्य लोकांच्या अडचणीला उभा रहाणारा लोकनेता अशी लोकांची भावना झालेली आहे तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेही जिल्हाप्रमुख व पदाधिकारी हे सर्वसामान्य लोकांनला मदत करतात, रात्री अपरात्री धावून येतात हे लोकांना कळून चुकले आहे. त्यामुळे बीड नगरपालिकेत विजयाची तुतारी आणि स्वाभिमानाची मशाल पेटणार आहे, असा विश्वास गोरख अण्णा सिंघन यांनी व्यक्त केला आहे.

# कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यावर मतांचे आशिर्वाद द्या - आ. विजयसिंह पंडित

## बीड शहरातील रामतिर्थ, आदर्शनगर येथील प्रचार सभेला उत्स्फुर्त प्रतिसाद

बीड /प्रतिनिधी
बीड शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस व मित्र पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी प्रचार सभांचा धडाका उडवून दिला असून शहरातील रामतिर्थ, हनुमाननगर व आदर्शनगर येथे झालेल्या प्रचार सभेला रेकॉर्डब्रेक गर्दी झाली. आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे यांच्यासह राष्ट्रवादी-शिवसेना-शिवसंग्राम व मित्रपक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत मतदारांना आवाहन केले.

बीड शहरात कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यांवर मतांचे आशिर्वाद देऊन बीड नगर परिषदेत परिवर्तन घडवा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. ३ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार सौ. सरवदे रेशमा रामदास आणि अमर मारुतीराव नाईकवाडे तसेच प्रभाग क्र. ९ मधील उमेदवार शेख शाहेद मुजफ्फर, सौ. पोपळे पुष्पा प्रभाकर यांच्या प्रचारार्थ रामतिर्थ, हनुमाननगर आणि आदर्श नगर येथे झालेल्या प्रचार सभेला आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे, इरफान बागवान, रामदास सरोदे, बबनराव



डोईफोडे, नागसिंग मस्के, सुभाष मोरे, दिगांबर फाटे, शिऊरभाई शेख, सुहास पाटील, अनिल घुमरे, श्रीमती प्रज्ञाताई खोसरे, शेख मुजीबभाई, ड.बाळासाहेब कोल्हे, इरफान बागवान, हमरून इरफान, सुनिल चव्हाण, चौरे आर.एस. यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मी आत्तापर्यंत प्रामाणिक काम केले - अमर नाईकवाडे

यावेळी बोलताना उमेदवार अमर नाईकवाडे म्हणाले की, गेली अनेक वर्षे माझ्या मतदार बंधु-भगिनींनी विश्वास दाखवला तो मी सार्थ केला, मिळालेल्या संधीचा उपयोग मी प्रामाणिकपणे करून विकास कामे केली. यापुढील काळात उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करून रामतिर्थ आणि परिसराचा कायापालट करू. राशन दुकान, आरोग्य सुविधा, अंगणवाडी आदी सुविधा उपलब्ध करून देऊ, त्यासाठी पुन्हा एकदा आशिर्वाद देऊन नगर परिषदेत पाठवा असे आवाहन त्यांनी केले.

### क्षीरसागर परिवाराने बीडकरांचा विश्वासघात केला - दिलीपराव गोरे

बीड प्रतिनिधी
बीड शहरातील नागरीकांनी मोठ्या विश्वासाने गेली ३५ वर्षे नगर परिषद क्षीरसागर परिवाराच्या हातात दिली, परंतु त्यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून कोणाचा विकास केला ? हे आता सांगायची गरज नाही. ३५ वर्षांपासून रस्ते, नाल्या, पाणीटंचाई असे गंभीर प्रश्न अजूनही रखडत पडलेले आहेत. आता आपल्याला संधी आलेली आहे परिवर्तन करायची. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहराचा कायापालट होणार आहे त्यासाठी घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून नगराध्यक्षांसह सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन माजी नगरसेवक दिलीपराव गोरे यांनी केले.

यांप्रसंगी भागवत तावरे, इरफान बागवान, रामदास सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# ना. अजित दादा पवार यांची आज विजयी सभा - शेख निजाम

## अजित दादांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहा

बीड /प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय अजित दादा पवार हे बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेम लता दादासाहेब पारवे व एकूण २६ प्रभागांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी च्या घड्याळ चिन्हावर उभी असलेले ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ शनिवारी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण मल्टीपर्पज मैदानावर जाहीर सभा होणार असून माननीय अजित दादा पवार यांची ही सभा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तथा २६ प्रभागातील ५२ उमेदवार यांच्या विजयाची नांदी घेऊन येणार आहे असे शेख निजाम यांनी म्हटले असून सभेला



मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.


पालकमंत्री अजितदादा पवार साहेब यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यापासून बीड जिल्ह्याचा व विशेष करून बीड शहराचा मागील ३५ वर्षापासून विकासाचा राहिलेला अनुशेष भरून काढण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्ष प्रकल्प हाती घेतलेले आहे ज्यामध्ये प्रामुख्याने ट्रिपल आयटी पार्क,विमानतळ, रेल्वे कनेक्टिव्हिटी, बीड शहरातील प्रमुख रस्ते इत्यादीचे काम दादांनी यापूर्वीच टू केलेले आहेत. बीड शहरातील जनतेने मतदाना रुपी आशीर्वाद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना दिल्यास अजित दादा बीड शहराच्या विकासाला झुकते माप देणार आहेत यामध्ये प्रामुख्याने बीड शहरातील स्वच्छता, भुयारी गटारी योजना, अमृत जल पाणीपुरवठा योजना, गोरगरिबांना घरकुल वाटप व बीड शहरातील सर्वच प्रभागातील लहान-मोठे रस्ते नाल्या व सर्व पायाभूत सुविधा दादांच्या माध्यमातून पूर्णत्वास येणार आहे अजित दादा पवार स्वतः पालकमंत्री अर्थमंत्री असल्याने बीड शहराला विकासासाठी अतिरिक्त निधी मागण्यासाठी कोणाचे आहे हाताकडे बघण्याची आवश्यकता नाही त्यामुळे बेड शहरातील जनतेने माननीय अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला घड्याळ चिन्हावर भरघोस मतदान करून विजय करण्याचा निश्चय केलेला आहे व उद्या होणारी अजित दादा पवार यांची सभा निर्णायक व विजयी सभा होणार असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख निजाम खय्युम इनामदार, बाळासाहेब गुंजाळ, मोमीन जुबेर, हाफेज अश्फाक, अमोल गलधर, जाधव यांनी केले आहे.

# वीरशैव लिंगायतच्या लेकीला नगराध्यक्ष पदासाठी मतपेटीतून बळ द्या - वैभव स्वामी

## उच्चशिक्षित दिव्या स्वामी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रंगत आणणार..!

बीड /प्रतिनिधी
बीड नगराध्यक्ष पदासाठी वीरशैव लिंगायत समाजातील तरुण सुशिक्षित लेकीने, बहिणीने उभ राहण्याचे धाडस केले आहे. बीड नगरीच्या सर्वांगीण विकासासाठी जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना, सत्तेला आपली मक्तेदारी समजणाऱ्यांना वीरशैव लिंगायत समाजासह बीड शहरातील सुजाण नागरिकांनी दिव्या स्वामी सारख्या सुशिक्षित बहिणीला १९ नंबर वरील शिट्टी या बटनावर बटन दाबून आपल्या अमूल्य मताची ताकद पाठीशी उभी करावी असे आवाहन पत्रकार वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड शहर आणि जिल्ह्याला आजही मागासलेला जिल्हा म्हणून पाहिले जाते. या जिल्ह्यातील पुढारी विकसित झाले मात्र हा जिल्हा विकसित झाला नाही. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी बदल घडवणे काळाची गरज झाली आहे. सुजाण मतदारांनी राजकीय पक्ष त्या पक्षातील पुढार्यांच्या भुलथापांना बळी न



पडता एका सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याची कन्या असलेल्या सुशिक्षित तरुण बहीण म्हणून दिव्या महेश स्वामी हिला नगराध्यक्ष करण्यासाठी येणाऱ्या २ डिसेंबर रोजी मशीन वरील १९ नंबरला शिट्टी असलेले चिन्ह यावर आपल्या अमूल्य मताचे दान बटन दाबून करावे आणि बीड जिल्ह्यामध्ये काहीही दिव्य घडू शकते यावर शिक्कामोर्तब करावे असे आवाहन पत्रकार वैभव स्वामी यांनी केले आहे.

### वीरशैव लिंगायत यांच्या एकजुटीमुळे चमत्कार घडणार..!

बीड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत वीरशैव लिंगायत समाजाने एकजुटीची ताकद मतपेटीतून व्यक्त करण्याचा निर्धार केला आहे. कोणताही गाजावाजा न करता कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता कोणाच्याही आमिषांना बळी न पडता आपल्या लेकीला आपल्या बहिणीला आपले अमूल्य मत



देण्याचा पक्का निर्धार तमाम वीरशैवाने केल्यामुळे बीड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत दिव्यात्मक चमत्कार घडेल अशी चर्चा होत आहे.यामुळे कालपर्यंत अलबेल असलेले सर्वच पक्षाचे पुढारी अस्थिर झाले आहेत.

## श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ

# ना. अजितदादा पवार यांची बीडमध्ये आज जाहिर सभा

### बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड /प्रतिनिधी
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम- सपा व मित्रपक्ष आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन बीड येथे करण्यात आले असून यावेळी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्यासह सर्व उमेदवारांनी आघाडी घेतली असून त्यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार



दुसऱ्यांदा बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात ना. अजितदादा पवार यांनी आपल्या जाहिर सभेत विकासाचे व्हिजन मांडल्यामुळे बीड शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यासह मतदारांमध्ये उत्साह भरला होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील बशीरगंज चौक येथे आज सायं. ५.३० वाजता होणाऱ्या या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून या सभेने राष्ट्रवादी कॉंग्रेस व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदासह सर्व ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्का मोर्तब होणार आहे.

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित राहणार असून या जाहिर सभेस बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित, डॉ.ज्योतीताई मेटे, अनिलदादा जगताप, खमरूल इमान यांच्यासह कल्याणराव आखाडे, दिलीप गोरे, शेख मुजीब, अमर नाईकवाडे, फारुक पटेल, बळीराम गवते, अशफाक इनामदार, झुंजार धांडे, शेख निजाम, भिमराव वाघचौरे, विनोद मुळूक, बाळासाहेब गुंजाळ, रामसिंग टाक, विनोद हातागळे यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम-सपा आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# दोन मातब्बर नेत्यांची 'मातोश्री पर्यटन केंद्रा'ला सदिच्छा भेट

अंबड /प्रतिनिधी :- अंबड-जालना महामार्गावरील लालवाडी येथील सुप्रसिद्ध मातोश्री पर्यटन केंद्रा ला नुकतीच दोन दमदार आणि लोकप्रिय नेत्यांनी सदिच्छा भेट देऊन केंद्राच्या लौकिकात भर घातली आहे.माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अर्जुन भाऊ खोतकर आणि माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अब्दुल सत्तार सेठ यांच्यासारख्या मातब्बर नेत्यांच्या आगमनामुळे लालवाडी परिसराचे महत्त्व वाढले असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

शेतकऱ्याच्या कल्पकतेला नेत्यांची दाद शेतकरी आणि यशस्वी उद्योजक गोवर्धन उगले पाटील यांच्या कल्पकतेतून साकारलेले हे मातोश्री पर्यटन केंद्र ग्रामीण उद्योजकता आणि शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगाचे उत्तम उदाहरण ठरले आहे.या केंद्राला भेट देऊन दोन्ही नेत्यांनी उगले पाटील यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक केले.

मातोश्री ची वाढती लोकप्रियता: अंबड-जालना महामार्गावर असलेले हे केंद्र अल्पावधीतच परिसरातील एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे.शेतीत नवनवीन प्रयोग करून एक यशस्वी पर्यटन केंद्र उभारल्याबद्दल उगले पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नेत्यांनी केले केंद्राचे कौतुक: आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार अब्दुल सत्तार सेठ यांनी केंद्राला भेट देऊन परिसराची पाहणी केली आणि उगले पाटील यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.




### आ.अर्जुन खोतकर आणि आ. अब्दुल सत्तार सेठ यांच्या उपस्थितीने अंबड-जालना महामार्गावरील लालवाडी ठरले लक्षवेधी

**नेतृत्वाचे गौरवपूर्ण उद्गार**
आ.अर्जुन खोतकर यांनी उगले पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की एका शेतकऱ्याने कृषी आणि पर्यटन क्षेत्राला एकत्र आणून जो यशस्वी प्रयोग केला आहे तो इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.
आ.अब्दुल सत्तार सेठ यांनी केंद्राच्या व्यवस्थापनाची आणि स्वच्छतेची प्रशंसा करत नमूद केले की या केंद्राच्या माध्यमातून स्थानिक **अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे.**
याप्रसंगी दोन्ही नेत्यांनी गोवर्धन उगले पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या भावी योजनांसाठी शुभेच्छा दिल्या.या सदिच्छा भेटीमुळे मातोश्री पर्यटन केंद्रा च्या नावलौकिकात मोठी भर पडली असून लालवाडी परिसर जिल्ह्याच्या नकाशावर लक्षवेधी ठरला आहे.

# प्रभाग पाच मधील भाजपा उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा- बाबा वाघमारे

गेवराई /प्रतिनिधी
नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे लोकनेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या निवडणूकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार आदरणीय गिताभाभी पवार यांच्यासह प्रभाग क्रमांक ५ मधील सौ.रेवती घुबार्डे व सौ. कविता एकनाथ लाड यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन युवानेते बाबा वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले



दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की मा.लक्ष्मण पवार यांनी भगवान घुबार्डे यांच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला आहे तसेच विविध योजनेतून अनेकांना लाभ मिळावा म्हणून आम्ही सातत्याने पाठपुरावा केला आहे तसेच विविध विकासकामे करण्यासाठी सौ.रेवतीताई भगवान घुबार्डे व सौ.कविता एकनाथ लाड सौ लाड यांचा विजय निश्चित आहे तरी मतदारांनी कोणाच्या भुलथापांना बळी न पडता कमळ चिन्हा समोरील बटन दाबुन आदरणीय गिताभाभी पवार यांच्यासह सर्व भाजपा उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन युवानेते बाबा वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

## जामखेडमधील भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप:

# सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांचा जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना थेट सवाल

अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील जामखेड येथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला असून या विरोधात आवाज उठवणाऱ्यांना दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी केला आहे.त्यांनी थेट जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मॅडम आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम यांना ३० मिनिटांची भेट देण्याची किंवा केलेल्या भ्रष्टाचाराचे आरोप मान्य करण्याची मागणी केली आहे. घटनेचे पालन की राजकीय दबाव ?

पंकज मंडलिक यांनी आपल्या निवेदनात प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ह्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाप्रमाणे चालतात की नेत्याच्या इशाराने चालतात ? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.आयएएस अधिकारी संविधानाची शपथ घेतात परंतु ती शपथ केवळ राजकीय आणि आर्थिक स्वार्थासाठी शून्य होते की काय अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे.मंडलिक यांचे एक तर जामखेडला भेट द्या नाहीतर केलेल्या भ्रष्टाचाराचे आरोप मान्य करा किंवा एखादा खोटा गुन्हा दाखल करा गरिबांच्या योजनांमध्ये भ्रष्टाचार आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

मंडलिक यांनी जामखेडमधील विविध शासकीय योजनांमधील कथित भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले आहे.घरकुल,शेतकऱ्यांचे अनुदान विहिरींसाठीचा पैसा अशा प्रत्येक योजनेत पैसा दिल्याशिवाय काम होत नाही. लाभ मिळाल्यानंतरही संपूर्ण काम होईपर्यंत पैसा न मिळाल्याने लाभार्थी हवालदिल होऊन आत्महत्या करतात.तो जिवंत आहे तोपर्यंत त्याला मदत करत नाही. कारण का ? आपल्या चिरीमिरीसाठी या सर्व गोष्टी फक्त गरिबासाठी व शेतकऱ्यांसाठी आहेत भ्रष्टाचारासाठी नाही असे गंभीर विधान त्यांनी केले आहे.भ्रष्टाचाराचे आकडे आणि कामांची लांबलचक यादीपंकज मंडलिक यांनी जामखेडमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या कामांची लांबलचक यादीच प्रशासनासमोर ठेवली आहे. यामध्ये कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप आहे:प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम सुमारे साडेचार ते पाच कोटी रुपये.ग्रामपंचायत वित्त आयोग/टाटा पॉवर निधी सुमारे दोन ते तीन कोटी रुपये.इतर शासकीय कामे दलित वस्ती, २५१५, ऊझऊउड निधीतील कामे.शेतकऱ्यांसाठी रस्ते रस्ते न करता लाखो रुपये उचलल्याचा आरोप.एकाच रस्त्यावर वारंवार कामामध्ये झालेला भ्रष्टाचार रोहिलागड ते जामखेड रस्त्यासह जामखेड परिसरातील आठ महत्त्वाच्या रस्त्यांवर वारंवार निधी उचलल्याचा आरोप.मंडलिक यांचा आरोप आहे की, एवढा मोठा भ्रष्टाचार होऊनही आजही गरिबाला रस्ता पगार, राशन,घरकुल,लाईट,आरोग्य सुविधा,चांगले शिक्षण आणि कायद्याचे अधिकार मिळत नाहीत.थेट आव्हान ३० मिनिटांची मागणीपंकज मंडलिक यांनी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना थेट आव्हान दिले आहे.आपण दोन-तीन वर्ष काढायचे आणि निघून जायचे बाकीचं टेन्शन घ्यायचं नाही या मानसिकतेतून बाहेर पडावे.

त्यांनी मागणी केली आहे की, वरिष्ठांनी फक्त ३० मिनिटांचा वेळ काढून जामखेडला भेट द्यावी आणि आपल्या डोळ्यांनी झालेला भ्रष्टाचार पाहावा. जर अधिकाऱ्यांना हा भ्रष्टाचार वाटला नाही तर ते प्रशासनाने केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीला सामोरे जाण्यास तयार आहेत.नसता आपणही या भ्रष्टाचारामध्ये सामील आहात हे मान्य करा असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे.रामभक्त असलेले पंकज मंडलिक यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की या प्रभू रामचंद्राच्या भूमीमध्ये आणि या कलियुगामध्ये जे काय होणार ते इथेच होणार म्हणून जे योग्य आहे ते करा.जय हिंद जय महाराष्ट्र जय श्रीरामआपलाच पंकज मंडलिक रामभक्त जामखेड



## घुंगर्डे हादगाव ते रुई पांदण रस्ता सुरू करण्यासाठी ग्रामस्थांचा तहसीलदारांकडे आग्रह

अंबड ।प्रतिनिधी

घुंगर्डे हादगाव ते रुई दरम्यानचा महत्त्वाचा पांदण रस्ता गेली अनेक वर्षे पूर्णपणे बंद असल्याने शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत.शेतमाल वाहतूक जनावरांची ने-आण रोजच्या कामांसाठीची दळणवळण व्यवस्था यावर या रस्त्याच्या बंद स्थितीचा गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र ग्रामस्थांनी

मांडले.या अत्यावश्यक रस्त्याची दुरुस्ती करून तो तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी आज घुंगर्डे हादगाव ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने तहसील कार्यालय गाठले आणि मा. तहसीलदार, अंबड यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात पोहोचविण्यासाठी मोठी फेरी मारावी लागत आहे,नागरिकांना पर्यायी मार्गाने दुहेरी अंतर कापावे लागत आहेआपत्कालीन परिस्थितीतही वेळेत वाहतूक करणे अशक्य होत आहे.ग्रामस्थांनी तहसीलदार साहेबांनी रस्त्याची वैयक्तिक पाहणी करून तातडीने कामास मंजुरी द्यावी अशी ठाम मागणी केली. रस्ता पुन्हा सुरू झाल्यास ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सुरळीत होईल आणि दोन्ही गावांच्या विकासाला नवी गती मिळेल असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.



## राष्ट्रीय काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस तुतारी युतीच्या प्रचारार्थ मा. अन्वर बापू देशमुख मा.कपिला आकात

### याची युतीत परतुरमध्ये विजयी तोफ

प्रतिनिधी ।परतूर

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या रणधुमाळीत राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस तुतारी युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. प्रतिभा सिद्धार्थ बँड यांच्यासह २० नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते अन्वर बापू देशमुख राष्ट्रवादी तुतारीचे नेते कपिल आकात परतूर येथे मोठ्या उत्साहात व अभूतपूर्व जनसमुदायाच्या साक्षीने संपन्न झाली. या या प्रचार दरम्यान परतूरच्या राजकीय वातावरणात मोठी ऊर्जा भरली असून युतीमुळे परतूरचा विकास हा संदेश

प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवला गेला. प्रचार रॅली दरम्यान अन्वर बापू देशमुख कपिला आकात युतीचे दिग्गज नेते उपस्थित होते. तसेच परतूरचा विकास आता केवळ आश्वासन नाही तर काळाची गरज आहे. असा त्यांनी प्रचार दरम्यान मतदाराला सांगितला आहे तसेच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होताना दिसत आहे परतूर नगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी तसेच राष्ट्रीय काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस तुतारी या दोघांची युतीमुळे परतुर चा राजकारण खूपच तपला आहे परतुर शहर काँग्रेसचा बाल किल्ला असून पुन्हा एकदा युतीमुळे काँग्रेस नगराध्यक्ष होण्याची दाट शक्यता असल्याची चर्चा परतुर शहरात सुरू आहे

# संविधान दिनाचा उत्साह कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालयात संविधान दिना'ची जयघोष

घनसावंगी ।प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ आणि जगातील सर्वात प्रभावी संविधान देणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस वंदन करण्यासाठी कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या झक्कास दमदार आणि आकर्षक पद्धतीने साजरा करण्यात आला.भव्य शुभारंभ आणि उद्देशिकेचे वाचन

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे कर्तव्यनिष्ठ मुख्याध्यापक श्री. केशव अटकर उपस्थित होते.त्यांच्या शुभहस्ते भारताच्या संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून कार्यक्रमाची दमदार सुरुवात झाली.यानंतर भारतीय संविधानाच्या मूळ तत्त्वज्ञानाचे प्रतीक असलेली संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले ज्यामुळे वातावरणात राष्ट्रीय मूल्यांचा जागर झाला.विद्यार्थ्यांचा जोशपूर्ण सहभाग




यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व मूलभूत तत्त्वे आणि मूल्यांचे दर्शन घडवणारी आकर्षक भित्तीपत्रके तयार केली.तसेच अनेक विद्यार्थ्यांनी संविधान आणि डॉ.आंबेडकरांच्या कार्यावर जोरदार भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

संविधान जागृती रॅली

संविधानाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचावे यासाठी संविधान दिनाचे महत्त्व सांगणारे फलक घेऊन शाळेच्या परिसरात जागृती रॅली काढण्यात आली.या रॅलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि परिसरातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय कर्तव्यांबद्दल जागरूकता निर्माण झाली.मार्गदर्शन आणि मौलिक संदेश

यावेळी शिक्षक श्री.जगन्नाथ जाधव यांनी उपस्थितांना संविधानातील मूलभूत अधिकार कर्तव्ये आणि नैतिक मूल्यांबाबत सखोल आणि प्रभावी मार्गदर्शन केले.त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूक,जबाबदार आणि सुजाण नागरिक बनण्याचे कळकळीचे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगत समता स्वातंत्र्य आणि बंधुता

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. केशव अटकर यांनी आपल्या मनोगतात संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की भारताचे संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून ते समता स्वातंत्र्य बंधुत्व आणि धर्मनिरपेक्षता यांसारख्या मूलभूत मूल्यांवर आधारित एक जीवनमार्ग आहे.विद्यार्थ्यांनी ही मूल्ये केवळ पुस्तकात न ठेवता ती आचरणात आणण्याची नितांत गरज आहे.त्यांनी विशेषत्वाने विद्यार्थ्यांना संविधानावरची एक सुंदर कविता ऐकवून उपस्थितांची वाहवा मिळवली.कार्यक्रमास शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन राशी जैन हिने केले, तर श्रीमती वंदना वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री एम. एम. सय्यद यांनी विशेष आणि मोलाचे प्रयत्न केले.

# वारकरी साहित्य हे मूल्य टिकवणारे आणि सामाजिक एकोपा जपणारे आहे - डॉ. सतीश बडवे

### माऊलीचे समाधीस्थळ ते जन्मस्थान हा प्रवास आज पूर्णत्वाच्या दिशेने - डॉ. सदानंद मोरे

प्रतिनिधी, पैठण

वारकरी साहित्य हे मूल्य टिकवणारे आणि सामाजिक एकोपा जपणारे आहे. त्यामुळे सामन्यातील सामान्य माणसाला देखील साहित्य लिहिता आले. इथे जात, धर्म, पंथ सोडून बहुजनांनी बोली भाषेत भक्ती मार्गातून साहित्य निर्मिती केली, असे प्रतिपादन डॉ. सतीश बडवे यांनी केले. ते वारकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. या संमेलनाचे उद्घाटन डॉ.सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. श्री मोरे यांनी सांगितले, की ज्ञानेश्वर महाराज यांची समाधी स्थानाहून मी प्रवास करत निघालो. पुढे नेवासा जिथे माऊलीने कथन केले आणि आज जिथे माऊलीचा आणि त्यांच्या भावंडांचे जन्मस्थान आहे. आज माझी प्रवास प्रक्रिया पूर्ण झाली असे वाटते. असे डॉ. सदानंद मोरे हे म्हणाले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन; महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई; तथा विशाल बहुद्देशीय प्रतिष्ठान, पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर जिल्हा वारकरी साहित्य संमेलन, श्रीक्षेत्र आपेगाव येथे दिनांक २८ रोजी सकाळी




सुरू झाले. ग्रंथ दिंडीने मोठ्या उत्साहात सुरू झाले. विविध शाळांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी या मध्ये सहभागी झाल्या होत्या.

संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. सतीश बडवे, प्रमुख पाहुणे आ. विलास (बापू) भुमरे, जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, कथाकार डॉ. भास्कर बडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य जय भाटकर यांची उपस्थिती होते. प्रास्ताविक संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्ञानेश्वर दादा कोल्हापूरकर यांनी केले. कार्यवाह संतोष तांबे यांनी संमेलन आयोजनाची भूमिका मांडली.

विविध धार्मिक-सांस्कृतिक संस्थांचे मान्यवर सदस्य येथे उपस्थित होते. दोन दिवस विविध साहित्यिक उपक्रमांची रेलचेल येथे असणार आहे.संमेलनात तीन परिसंवाद असतील. ग्रंथदिंडी आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजनशुक्रवार सकाळी पारंपारिक ढोल-ताशांच्या गजराने ग्रंथ व वारकरी दिंडी काढण्यात आली. बैलगाडीने ते अधिक लक्षवेधी झाले. दिंडीचे उद्घाटन डॉ. भास्कर बडे यांच्या हस्ते करण्यात आले. तर शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. शासनाच्या आणि स्थानिक लेखक, संशोधक आणि संत साहित्य अभ्यासकांच्या ग्रंथांचे

प्रदर्शन लावण्यात आले.

पैठण नगरी ही संमेलनाची भूमी बनली आहे. ही साहित्य संमेलनाची नगरी बनली. यासाठी संतोष तांबे यांचे आणि त्यांच्या विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान पैठण या त्यांच्या संस्थेचे मी अभिनंदन करतो. यापुढे सतत साहित्य संमेलन आयोजित करण्यात योगदान देऊ असेही आश्वासन दिले. पैठण तालुका संताची भूमी आहे. त्यासाठी ही साहित्य परंपरा जोपासली जावी. अशी अपेक्षा त्यांनी करतो.

- आ.विलास भुमरे




## संतांच्या संगतीत जीवनाच सोनं होत - श्री ह भ प.प्रा नाना महाराज कदम नेकनूरकर

### अवधूत दत्त संस्थानवर आज साक्षात पंढरी अवतीर्ण झाली - श्री ह भ प नाना महाराज कदम

बीड /प्रतिनिधी

श्रीक्षेत्र अवधूत दत्त संस्थान वर आज साक्षात पंढरी अवतीर्ण झाली, मानवी जीवनात संगतीला अनन्य साधारण महत्त्व आहे. संताची संगत करण्याची संधी मिळाली तर दवडू नका. संतांच्या संगतीतच जीवनाचं सोनं होतं. असे प्रतिपादन श्री ह भ प प्रा नाना महाराज कदम यांनी केले. श्रीक्षेत्र अवधूत दत्त संस्थान कोल्हारवाडी फाटा येथे जयंतीनिमित्त निमित्त आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताहात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार, आदित्य दादा पवार, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प स्वरांजली ताई, हिंगे,श्री ह भ प कल्याण महाराज, विश्वास नाना आखाडे यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.बीड शहराजवळील अध्यात्मिक शक्ती केंद्र श्रीक्षेत्र अवधूत दत्तात्रेय संस्थान कोल्हारवाडी फाटा येथे दत्त जयंती उत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताहात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ श्री ह भ प नाना महाराज कदम यांनी गुंफले. यावेळी नामांकित गायक श्री ह भ प किशोर महाराज येडे, नामदेव महाराज आघाव, अण्णासाहेब महाराज शेळके , मृदंग वादक ओमकार महाराज कागदे यांच्यासह मोठ्या संख्येने गायक वादक गुरुजन मंडळी उपस्थित होते.या संपूर्ण उत्सवात आदित्य दादा पवार मित्र मंडळाच्या वतीने सर्व व्यवस्था करण्यात आली आहे.



बदनापूर-(प्रतिनिधी) बदनापुर तहशील कार्यालय येथे नव्याने रुजू झालेल्या श्रीमती तेजस्विनी जाधव तहशीलदार साहेब यांचा वंचित बहुजन आघाडी बदनापूर तालुक्याच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्रकाश मगरे वंचित बहुजन आघाडी तालुका महासचिव दीपक खाजेकर, वंचित बहुजन आघाडी सहसचिव रामेश्वर गाडगे, आप्पासाहेब पाटोळे, अजय गडवे, राजु घोरपडे, भगुरे बाबा, रावसाहेब पाटोळे, दिपक कांबळे, जितेंद्र गाडगे, व वंचित बहुजन आघाडी चे सर्व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

## लोणार भायगावचा अभिमान! शुभम कुंडकरची सांस्कृतिक मंचावर दणदणीत चमक

जालना ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील लोणार भायगाव या लहानशा गावातील शुभम राधाकिसन कुंडकर या तरुणाने शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही बहुमुखी प्रतिभेची उज्ज्वल छाप उमटवत गावाचे नाव राज्यपातळीवर झळकावले आहे. विशेष म्हणजे शुभम हा जामखेड पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास जाधव यांचा भाचा असून त्याच्या यशाने जाधव कुटुंबासह गावातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यवतमाळ येथील डी.एम.एम. आयुर्वेद महाविद्यालयात झालेल्या ऊीश्रींीीरश्र चशर्शी २०२५ मध्ये प्रचंड स्पर्धा असतानाही शुभमने दोन ट्रॉफीज आणि एक सुवर्णपदक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. फॅशन शो, नृत्य आणि टॅलेंट एक्स्प्रेशन अशा उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये शेकडो स्पर्धकांमध्ये उठून दिसत त्याने परीक्षक व प्रेक्षकांना थक्क केले. व्यासपीठावरील त्याच्या दमदार परफॉर्मन्सने सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.



# दोन मातब्बर नेत्यांची 'मातोश्री पर्यटन केंद्रा'ला सदिच्छा भेट

## आ.अर्जुन खोतकर आणि आ. अब्दुल सत्तार सेठ यांच्या उपस्थितीने अंबड-जालना महामार्गावरील लालवाडी ठरले लक्षवेधी

अंबड ।प्रतिनिधी

अंबड-जालना महामार्गावरील लालवाडी येथील सुप्रसिद्ध मातोश्री पर्यटन केंद्रा ला नुकतीच दोन दमदार आणि लोकप्रिय नेत्यांनी सदिच्छा भेट देऊन केंद्राच्या लौकिकात भर घातली आहे.माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अर्जुन भाऊ खोतकर आणि माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अब्दुल सत्तार सेठ यांच्यासारख्या मातब्बर नेत्यांच्या आगमनामुळे लालवाडी परिसराचे महत्त्व वाढले असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

शेतकऱ्याच्या कल्पकतेला नेत्यांची दाद शेतकरी आणि यशस्वी उद्योजक गोवर्धन उगले पाटील यांच्या कल्पकतेतून साकारलेले हे मातोश्री पर्यटन केंद्र ग्रामीण उद्योजकता आणि शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगाचे उत्तम उदाहरण ठरले आहे.या केंद्राला भेट देऊन दोन्ही नेत्यांनी उगले पाटील यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक केले.




मातोश्री ची वाढती लोकप्रियता: अंबड-जालना महामार्गावर असलेले हे केंद्र अल्पावधीतच परिसरातील एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे.शेतीत नवनवीन प्रयोग करून एक यशस्वी पर्यटन केंद्र उभारल्याबद्दल उगले पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.नेत्यांनी केले केंद्राचे कौतुक: आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार अब्दुल सत्तार सेठ यांनी केंद्राला भेट देऊन परिसराची पाहणी केली आणि उगले पाटील यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.नेतृत्वाचे गौरवपूर्ण उद्गारआ.अर्जुन खोतकर यांनी उगले पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की एका शेतकऱ्याने कृषी आणि पर्यटन क्षेत्राला एकत्र आणून जो यशस्वी प्रयोग केला आहे तो इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.आ.अब्दुल सत्तार सेठ यांनी केंद्राच्या व्यवस्थापनाची आणि स्वच्छतेची प्रशंसा करत नमूद केले की या केंद्राच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे.याप्रसंगी दोन्ही नेत्यांनी गोवर्धन उगले पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या भावी योजनांसाठी शुभेच्छा दिल्या.या सदिच्छा भेटीमुळे मातोश्री पर्यटन केंद्रा च्या नावलौकिकात मोठी भर पडली असून लालवाडी परिसर जिल्ह्याच्या नकाशावर लक्षवेधी ठरला आहे.

# मा.आ.लक्ष्मण आण्णांनी नाट्यगृहाला दिले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव

## निवडणुकीत भाजपला फायदा होऊ नये म्हणून यांनीच वर्षभर नाट्यगृह सुरू होऊ दिले नाही - माजी नगरसेवक कृष्णा काकडे यांचा आरोप

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई शहरात माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून तब्बल ७ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेले भव्य नाट्यगृह काम पूर्ण करून त्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले. मात्र गेल्या वर्षभरापासून हे नाट्यगृह सुरू न करण्यामागे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचा राजकीय हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक कृष्णा काकडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.

पुढे काकडे म्हणाले की, लक्ष्मण आण्णांनी अडथळ्यांचा सामना करत हे नाट्यगृह पूर्ण केले आणि सभागृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले. हे नाव दिल्याने व हे काम पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीत याचा फायदा भाजपला होईल, या भीतीने राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुद्दामच अडथळे निर्माण केले.

काकडे यांनी पुढे म्हटले की, नगरपरिषदेत प्रशासक असताना संबंधित राष्ट्रवादी नेत्यांनी नाट्यगृह सुरू होऊ नये यासाठी जाणूनबुजून खोडा घातला. केवळ लाईट कनेक्शन न बसल्यामुळे हे नाट्यगृह सुरू होऊ शकले नाही. या संदर्भात मी स्वतः दि.९ एप्रिल २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन अनेक वेळा पाठपुरावा करत तात्काळ मीटर बसवून नाट्यगृह सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र निवडणूक जवळ आल्याने हे सभागृह सुरू झाले तर त्याचा राजकीय फटका बसेल, या भीतीने प्रशासकावर दबाव टाकत नाट्यगृह अडविण्याचे काम राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केले, असा स्पष्ट आरोप त्यांनी केला.

तर लक्ष्मण आण्णांच्या माध्यमातून झालेल्या या नाट्यगृहामुळे येणाऱ्या काळात गेवराईतील सांस्कृतिक आणि कलाक्षेत्रासाठी मोठा फायदा शहरवासीयांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर यांनी कितीही अडवणूक करत रडीचा डाव खेळला तरी गेवराई शहरातील जनता ही पवार कुटुंबियांच्याच पाठीशी असून येत्या २ तारखेला भाजपच्या सौ.गीताभाभी पवार यांच्यासह सर्वच्या सर्व उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी होतील असे त्यांनी सांगितले.




# बरबडा येथे येळकोट येळकोट जय मल्हार च्या जेय घोषणेत

पालखी मिरवणूक संपन्न

नायगाव तालुक्यातील बरबडा येथे खंडोबा देवाची पालखी व जत्र मोठ्या उत्साहात मनोभावी एक महिणा पुजा पाठ दि . २८ रोजी सकाळी विविध सामाजिक राजकीय मंडळी घ्या उपस्थित खंडोबा देवाची पालखीचे पूजन करून पालखी बरबडा गावाने मिरवणूक काढण्यात आली येळकोट येळकोट जय मल्हार च्या घोषणेने पालखी मिरवणूक काढण्यात यावेळी मनोज पाटील मोरे , माणिक लोहगावे , बालाजी मदेवाड. , सुदर्शनराव धर्माधिकारी , बाळासाहेब धर्माधिकारी . प्र . मनोहर पवार , बालाजी धर्माधिकारी , व्हि टि .सुरेवाड धनगर समाजातील सर्व समाज बांधव उपस्थित होते व आदि गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या बरबडा येथील व परिसरातील नागरिकांनी श्री.खंडोबारायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थितीत होते

# संविधान केवळ कायद्याचा ग्रंथ नसुन देशाच्या व्यवस्थेचा कना आहे न्या.ए.एस.जगताप

### संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांची न्यायालय भेट - संविधान मूल्यांची प्रत्यक्ष ओळख

मानूर /प्रतिनिधी ह्व

दिनांक २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने ग्रामीण विकास केंद्र या संस्थेच्या वतीने मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष न्यायालय भेटीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची प्रत्यक्ष ओळख करून देणे तसेच न्यायव्यवस्थेचे कार्य जवळून समजावून सांगणे हा होता.



कार्यक्रमाची सुरुवात संविधान उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. यावेळी मा. न्यायाधीश जगताप साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संविधानाचे महत्व, त्यामध्ये नमूद केलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूलभूत तत्त्वे सविस्तरपणे स्पष्ट केली. संविधान केवळ कायद्याचा ग्रंथ नसून देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा कणा आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी संविधानाचे पालन करणे व जबाबदार नागरिक बनणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्रामीण विकास केंद्राचे अध्यक्ष समीर पठाण यांनी आपल्या मनोगतात अशा शैक्षणिक उपक्रमांचे महत्व अधोरेखित करत सांगितले की, विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणासोबतच प्रत्यक्ष अनुभव मिळणे आवश्यक आहे. न्यायालय भेटीमुळे विद्यार्थ्यांना कायदा, न्यायप्रणाली व प्रशासन यांची समज अधिक व्यापक होईल.

मॉडर्न इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक माही सर आणि संध्या पवार मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्यात संविधानाविषयी जागरूकता निर्माण होण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी न्यायालयीन कामकाज, वकिलांची भूमिका आणि न्यायप्रक्रियेविषयी प्रश्न विचारले, त्याला उपस्थित मान्यवरांनी समर्पक उत्तरे दिली.

या प्रसंगी वकील संघटनेचे सर्व वकील, न्यायालयीन कर्मचारी व पोलीस प्रशासनाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधान प्रकर्षाने रुजले असून, त्यांना जबाबदार व सुसंस्कारित नागरिक घडविण्यास या उपक्रमाचा मोठा फायदा झाला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'शिरूरचा 'आलं आभाळ भरून' कवितासंग्रह अकरावी, बारावीच्या अभ्यासक्रमात

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार येथील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'आलं आभाळं भरून' या बालकुमार कवितासंग्रहाची निवड पीएमश्री, समग्र शिक्षा योजना अंतर्गत शालेय ग्रंथालयांसाठी इयत्ता अकरावी आणि बारावीच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या या कवितासंग्रहाचा समावेश सन-२०२५ पासून होत आहे.

डॉ.विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएच.डी पदवी प्राप्त असून त्यांच्या 'पांढरा कावळा' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. यासह मानवता व्हाऊचर लेखसंग्रह, एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य हा संशोधनपर समीक्षा ग्रंथ अशी दहा पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकुमार साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नियतकालिके, आकाशवाणीवर साहित्य लेखनास स्थान मिळाले आहे.




'आलं आभाळ भरून' हा डॉ. जाधव यांचा कवितासंग्रह शासकीय शाळा, आश्रमशाळा यांमधून अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत अभ्यासता येणार आहे. निसर्ग, शेतीमाती, सामाजिक प्रश्न सोबतच देशभक्ती, वर्तमान समाजजीवन या विषयीच्या रचना या संग्रहात आहेत. या निवडीसाठी डॉ. जाधव यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# जिल्ह्याबाहेर ही ऊस आंदोलनाची व्याप्ती वाढली

## शेकडो शेतकऱ्यांचा फौजफाटा विविध कारखान्यावर धडकला

बीड / प्रतिनिधी

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या

कोयता बंद, वाहतूक बंद आंदोलन करत असून या आंदोलनाची व्याप्ती जिल्ह्याबाहेर पोहचली असून ऊसाचा ग्रीन बेल्ट असलेल्या परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील असंख्य गावातील शेतकरी यांनी समितीला पाठींबा देत शेतकऱ्यांनी आपली ऊस तोड व ऊस वाहतूक थांबवली आहे. यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने समितीत सामील होऊल पेक्षा अधिक वाहनाद्वारे जिल्ह्यातील सर्वच साखर कारखानदारांना भेटी देत आपल्या मागण्याचे निवेदन दिले.



ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत कारखानदारांनी कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्यामुळे ही चर्चा निष्फळ ठरली. ऊस दर बाबत कोणताही निष्कर्ष निघाला नसल्याने ऊस आंदोलन चिघळले आहे. जिल्ह्यातील ऊस तोड, ऊस वाहतूक ठप्प झाली असून काही साखर कारखाने बंद तर उर्वरित येत्या काही दिवसात ऊसाची आवक नसल्याने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशातच शुक्रवार दि २८ रोजी शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वाहनांच्या ताफ्याद्वारे जिल्ह्यातील ओंकार शुगर्स पांगरी, अंबा साखर अंबाजोगाई, येडेश्वरी शुगर्स केज, गंगा माऊली शुगर्स केज या ठिकाणी ल शेतकरी समितीने भेटी देऊन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारने ऊसासाठी प्रत्येक टनासाठी ३५५५ रु. दर १०.२५ रिकव्हरीला जाहीर केला आहे. आपणाकडे ११ किंवा त्यापेक्षा जास्त सरासरी रिकव्हरी लागत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षात घेता प्रती टन ३ हजार रू. पहिली उचल तर ४ हजार रु. अंतिम दर मिळाला पाहीजे ही मागणी निवेदने करून केली. याबाबत जिल्हाधिकारी, बीड व साखर सहसंचालक छ. संभाजीनगर विभाग यांना देखील कळवण्यात आले आहे.

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने सुरू केलेल्या या आंदोलनास विविध ऊस तोड कामगार संघटना, विविध गावातील ग्राम पंचायत, सेवा सहकारी सोसायटी यांनी ठराव मंजूर करत पाठिंबा दिला असून ऊस प्रश्नी पेटलेले हे आंदोलनाबाबत साखर कारखानदारांनी सकारात्मक प्रतिसाद न दिल्यास हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेऊन जन आंदोलन होईल असे कृती समितीकडून सांगण्यात येत आहे.

# यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा जपण्याची काळजी गरज

श्रीमती डॉ. कमलताई गवई यांचे मत

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा वारसा जपण्याचे गरज आहे ते काम यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह करतो आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. कमलताई गवई यांनी व्यक्त केले आहे.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच डॉ. कमलताई गवई यांनी जगातील महापुरुषांना अभिवादन करुन यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतींना वंदन केले. आपल्या भाषणात त्या पुढे म्हणाल्या की, सयशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण स्मृती समिती मागील ४० वर्षांपासून जे विविध उपक्रम राबविण्यात येतात, ते सर्व मला जवळून पहाता आले याबद्दल समितीचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ज्या चार कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान माझ्या हस्ते करण्यात आला याबद्दल समितीचे विशेष आभार त्यांनी मानले. विविध क्षेत्रातील चार व्यक्तींची माहिती गोळा करून त्यांचा सन्मान करणे हे मोठे काम आहे असे त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणात त्यांनी रा. सु. गवई यांच्या सहवासातील अनेक आठवणींना उजाळा डॉ . कमलताई गवई यांनी दिला.

रा. सु. गवई यांच्याशी विवाहानंतर संसाराची जबाबदारी सांभाळतांना अनेक कसरती कराव्या लागल्या. मी मुळात शिक्षिका असल्यामुळे मुलांवर संस्कार करणे महत्त्वाचे आहे. आपल्या मुलांची ओळख चांगला माणूस म्हणून व्हावी अशी इच्छा होती आणि ती इच्छा माझ्या न्या. भूषण गवई व राजेंद्र या मुलांनी पुर्ण केली याचा मला अभिमान आहे.

रा. सु. गवई आणि यशवंतराव चव्हाण यांचे अत्यंत घरगुती संबंध होते. गवई साहेबांचे विचार आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारात बरेच साम्य आहे. यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेवूनच त्यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनात काम केले. ग्रामीण विभागातील मुलांना शिक्षीत करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागात अनेक शिक्षण संस्था काढल्या. अशा यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा वारसा जपण्याचे काम यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह करतो आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. कमलताई गवई यांनी व्यक्त केले.




येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या समारोपीय भाषणात डॉ . कमलताई रामकृष्ण गवई बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर श्रीमती विजया गंगाधर घुले-आष्टी, केशव वसेकर-परभणी, पं. मुकेश जाधव-औसा-पुणे व कु. प्रियंका हनुमंत इंगळे यांच्या आई वडिलांनासह यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचिव दगडू लोमटे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ४० वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका-यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली असल्याचे सांगितले. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला-संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात देण्यात येते.

यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार २०२५

या कार्यक्रमात डॉ. कमलताई रामकृष्ण गवई यांच्या हस्ते श्रीमती विजया गंगाधर घुले-केळ सांगवी ता.आष्टी यांना आदर्श शेतीसाठी, केशव वसेकर-प्रभावी यांना साहित्य, पं. मुकेश जाधव औसा- पुणे यांना संगीत तर कुत. प्रियांका हनुमंत इंगळे, कळंब अंबा ता. केज हिला युवा क्रीडा गौरव असे यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, आणि रोख पाच हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

या तीन दिवसीय समारोहात चित्रकला प्रदर्शन, कृषी प्रदर्शन, ग्रंथ विक्री व कृषी विषयक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कै. भगवानरावजी लोमटे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या समारोहाचे महाराष्ट्रभर कौतुक होत आलेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलेल्या या समारोहास रसिक श्रोत्यांनी तिन्ही दिवस उपस्थित उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल समितीच्या वतीने आभार मानले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ . कमलताई गवई यांचा सत्कार व मान्यवरांचे स्वागत यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सतीश लोमटे यांनी केले. परिचय कमलाकर कांबळे, सूत्रसंचालन राजा कुलर्णी व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय ज्योती भोसले यांनी केला. तीन दिवसीय या समारोहातील सर्वच कार्यक्रमांना रसिक श्रोत्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# महात्मा फुले स्मारक समिती तर्फे संविधान दिन साजरा

## संविधानाने समाजात मानवी मूल्यांची पेरणी केली - डॉ.राजेश इंगोले
## संविधानाने सामान्य माणसाला सन्मान मिळवून दिला :- प्रा.शैलजा बरूळे





अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील महात्मा फुले स्मारक समिती, अंबाजोगाई तर्फे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, संविधान विषयाच्या व्याख्याता प्रा.शैलजा बरूळे, रिपाइं आठवले गटाचे नेते मा.महेंद्र निकाळजे, समिती सचिव रत्नदीप गोरे, उपाध्यक्ष प्रा.अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व संविधानाच्या प्रास्ताविक वाचनाने करण्यात आली. यावेळी बोलताना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी संविधानाने मानवी मूल्यांना बळकटी दिली आहे. प्रत्येक नागरिकास त्याचे हक्क अधिकार आणि कर्तव्य याची जाणीव करून देण्यात आलेली आहे. संविधानाने सर्वसामान्य माणसाला सत्तेचा केंद्रबिंदू बनविला आणि आपल्या जीवनात आचरण कसे असावे हे शिकवले आहे हे संविधान लिहीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना तब्बल तीन वर्षांचा कालावधी लागला या कालावधीमध्ये त्यांनी भारताला महासत्ता बनविण्याचा महामार्ग बनवला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखित या संविधानामुळे भारतामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता हे मूल्य रूजविली गेली आणि भारतामध्ये मानवी मूल्य पेरली गेली. भारतामध्ये अनेक जाती, पंथ, धर्म, भाषा, प्रांत असताना भारत एकसंघ आहे. याचं कारण, फक्त आणि फक्त संविधान आहे असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. संविधान विषयाच्या व्याख्यात्या बरूळे यांनी भारतीय संविधान जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे व भारतीय संविधानाचे संदर्भ घेऊन अनेक राष्ट्रीय त्यांचा राज्य कारभार त्या पद्धतीने चालवतात या शब्दांत संविधानाचे महत्त्व विशद केले. संविधानाने सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्याची प्रेरणा दिली मानवी अधिकारांची आणि कर्तव्यांचे महत्त्व समजावून सांगितले आणि याद्वारे राष्ट्राची एकात्मता कशी अबाधित राहील याकडे संविधानाने विशेष लक्ष दिले असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांनी मानले.

## ग्रामीण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे!:-प्रा.सुरज छनवाल



### जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान

पाटोदा.(प्रतिनिधी ) दिनांक २८नोव्हेबंर :ग्रामिण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे! यश मिळतेच.असे प्रतिपादन अहिल्यानगर येथिल प्रहार कॅडमीचे संचालक प्रा.सुरज छनवाल यांनी केले.ते जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या संधी व त्यासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि अभ्यासाची दिशा यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या अध्ययक्षतेखाली व प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला,व्यासपीठावर समाजशास्त्र विभाग प्रमुख व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुनील जाधव सर, माजी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे सर व प्रा.सतिश जरांगे सर हे देखील उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. डॉ.सुनिल जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षे विषयी पूर्वज्ञान मिळावे म्हणुन महिविद्यालयात अशा व्याख्यानाचे आयोजन संबधीत विभागाच्याहवत्तीने केले जाते.यामधुन विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी!असे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अहवान केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक या विभागाच्या समन्वयक विद्यापीठ अधिसभा सदस्या श्रीमती प्रा.डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे यांनी केले. तर आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. बंडू लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. डॉ.सुनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.सिद्धीकी सर, प्रा. डॉ.शिवाजी काकडे सर, प्रा. डॉ. फून्ने सर,प्रा. पापाजी चव्हाण सर यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित

# वडवणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून शेतकऱ्यांची अडवणुक

### भाजपा उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी केली जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार




वडवणी/ प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी असणारे तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारी,कर्मचारी गैरहजर असतात तसेच कृषी सहाय्यक हे सज्जाचे गावी जात नाहीत तसेच कार्यालयात कामासाठी आलेल्या शेतकऱ्यांची आडवणुक केली जाते तरी वडवणी तालुका कृषी अधिकारी कार्यालय अधिकारी, कर्मचारी व कृषी सहाय्यक यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी नसता भारतीय जनता पार्टी व शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेवराव सावंत यांनी दि. २८ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी असणारे तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे तालुका कृषि कार्यालयात, तसेच कृषि सहाय्यक हे प्रत्येक गावोगावी जात नसुन ते कार्यालयात देखीत सतत गैरहजर असतात तसेच अतिवृष्टीने नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांचे अनुदान यादीला नांवे आलेले नाहीत ते शेतकरी कृषि कार्यालयात कागदपत्रे देण्यासाठी जातत त्यावेळी कोणीही कर्मचारी, तेथे कधीही उपस्थित नसतात त्यामुळे शेतकऱ्यांची एक प्रकारे आडवणुक होत असुन यास कृषि कार्यालय जबाबदार आहे. तसेच पंतप्रधान सन्मान निधीचे तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना पैसे खात्यावर येत नाहीत यासाठी करण्यात येणारी ऑनलाईनच्या केवायसी साईट देखील सतत बंद असते त्यामुळे अनेक शेतकरी यापासुन वंचित राहत आहेत. तरी सदरील प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी वेबसाईट ही २४ तास चालु ठेवण्यात यावी.तसेच सदरील अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक यांना शेतकऱ्यांचे कामे करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात व सज्जाच्या ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देवुन ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदानातुन नांवे यादीत आलेले नाहीत त्यांचा सर्वे करुन पुर्तता करण्यात यावी व जे अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक हे कार्यालय व सज्जाच्या गावी हजर राहत नाहीत याची चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन भाजपाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे या निवेदनाच्या प्रती

. मा. ना. पंकजाताई मुंडे साहेब, मंत्री पर्यावरण व पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य., आ. प्रकाशदादा सोळंके, मा. हंसराज अहीर ओबीसी व मागासवर्गीय आयोग राष्ट्रीय अध्यक्ष त्यांना माहितीस्तव दिलेले आहेत.

# एकलव्य विद्यालयात संविधान दिनानिमित्त विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहात पार - लोकशाहीची प्रत्यक्ष शिकवण




मानूर प्रतिनिधी ह्व

लोकशाहीची खरी शक्ती म्हणजे स्वच्छ, पारदर्शक व नियमबद्ध निवडणूक प्रक्रिया. हा लोकशाहीचा अनमोल धडा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे देण्याच्या उद्देशाने एकलव्य विद्यालय, शिरूर कासार येथे २६ नोव्हेंबर संविधान दिन विशेष उपक्रम म्हणून विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या उपक्रमाचे मार्गदर्शन प्रा. सचिन सानप सर यांनी केले. शिक्षणासोबत लोकशाहीची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हेच या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले.ईव्हीएमच्या माध्यमातून तंत्रज्ञानाधारित मतदानाचा अनुभवनिवडणुकीसाठी ईव्हीएम (एश्रशलींपळल तेींळपस चर- लहळपश) चा वापर करून विद्यार्थ्यांना आधुनिक, तंत्रज्ञानाधारित मतदान प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.नामनिर्देशन, अर्ज छाननी, माघार, प्रचार, मतदान ते मतमोजणीपर्यंत सर्व प्रक्रिया नियमबद्ध पद्धतीने पार पडल्या. विद्यार्थ्यांनी या सर्व टप्प्यांत सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही पोषक कार्यप्रणाली समजून घेतली.

अकरा जागांसाठी तब्बल अठ्ठेचाळीस उमेदवार

इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकडून प्रतिनिधी निवडण्यासाठी एकूण ११ जागांसाठी ४८ उमेदवार रिंगणात होते. शाळेतील जवळपास ६५० विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला, ही या उपक्रमाची विशेष नोंद घेण्यासारखी बाब ठरली.

मतदान प्रक्रिया सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० दरम्यान पार पडली. मतमोजणीनंतर निकाल जाहीर करण्यात आला यात इयत्ता पहिली ते दहावी चे यश खेडकर , प्रीतम बडे, श्रवण मार्कड, विनायक राख, किरण वाघमारे, अक्षद बडे, यशराज बडे, साद शेख विद्यार्थी प्रतिनिधी तर मानसी केदार ,तृषा ढाकणे,वेदिका सानप विद्यार्थिनी प्रतिनिधी विजयी झाले. सर्व विजयी उमेदवारांचा सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला.मतदान अधिकाऱ्यांची भूमिका विद्यार्थ्यांकडेच

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी मतदार तपासणी, मतदान याद्यांवरील स्वाक्षऱ्या,बोटाला शाई लावणे, रांगेचे व्यवस्थापन इत्यादी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या स्वतः सांभाळल्या. शाळेचा परिसरही प्रत्यक्ष मतदान केंद्रासारखा सजविण्यात आला होता.

या उपक्रमाच्या यशस्वीतेत मार्गदर्शक प्रा. सचिन सानप सर,संस्थेचे अध्यक्ष नवनाथ पांडुरंग सानप, विद्यालायाचे प्राचार्य, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले.

एकलव्य विद्यालयाच्या अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी जागरूक, आत्मविश्वासी व सजग नागरिक बनण्याच्या दिशेने निश्चित वाटचाल करत आहेत

एकलव्य विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी जागरूक, आत्मविश्वासी व जबाबदार नागरिक घडण्याच्या दिशेने सक्षमपणे वाटचाल करत आहेत. विद्यालयाचा हा उपक्रम समाजात लोकशाहीबद्दल सकारात्मक मूल्ये रुजविणारा ठरला आहे.



## खंडोबा यात्रेनिमित्त कवडगाव येथे भव्य कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे दिनांक २७ नोव्हेंबर रोजी खंडोबा यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात्रेच्या पारंपरिक आणि धार्मिक उत्साहात रंग भरत पालखी मिरवणूक, वाघ्या-मुरळीचे कार्यक्रम तसेच जंगी कुस्ती स्पर्धांनी परिसर दणाणून गेला.

गावातील सरपंच शेख बशीर, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावकऱ्यांनी एकत्रितपणे उत्कृष्ट व्यवस्थापन करत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. परिसरातील अनेक भाविक भक्तांनी यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली, तर कुस्तीप्रेमींनी जंगी कुस्त्यांचा मनसोक्त आनंद घेतला.

यावेळी झालेल्या कुस्ती दंगालीत शेवटच्या कुस्तीचे बक्षीस ५००१ इतके ठेवण्यात आले होते. अंतिम कुस्ती ही चिंचला गावचे नसीर शेख आणि अलीम पटेल यांच्या दरम्यान झाली. शेवटच्या फेरीला मोठा उत्साह आणि प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळाली.




# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंना स्मृतिदिनी आष्टी तालुक्यात ठिकठिकाणी अभिवादन

आ.सुरेश धस, युवा नेते अजय धोंडे यांनी प्रतिमेचे पूजन करून वाहिली आदरांजली

आष्टी - (प्रतिनिधी) सत्यशोधक समाज संस्थेद्वारे समाजसुधारण्याचे व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची दि. २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी पत्नी , सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या ज्योतिबांना आष्टीत आ. सुरेश धस, युवा नेते अजय धोंडे यांच्या सह तालुक्यात ठिकठिकाणी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आदरांजली वाहिली आहे. अन्याय - अत्याचारापासून व गुलामगिरीतून तथाकथित शुद्रातिशुद्र समाजाची मुक्तता करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन ज्यांनी संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षणासाठी वेचले असे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३५ व्या पुण्यतिथी निमित्त आष्टी शहरातील क्रांतीसुर्य महात्मा फुले चौकामध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेला आ. सुरेश धस, युवा नेते अजय धोंडे यांनी सकाळी पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, सरपंच अशोक मुळे, नगरसेवक अक्षय धोंडे, नगरसेवक शरीफ भाई नगरसेवक नाना राऊत, सुनिल रेडेकर, पवन विधाते सर, सुरज शिंदे सर, दत्ता बोडखे, शिवराज लगड, हर्षद धोंडे, भागवत धोंडे, माजी सरपंच मनोज धनवडे, चिंटू शेट अग्रवाल, स्वप्निल धोंडे, शरद धनवडे, दिपक निकाळजे, आदेश निमोणकर, अक्षय सायकड, विधिज्ञ राजदीप निकाळजे, सचिन रानडे, पंकज सिदनकर, बाला कदम, शंकर धोंडे, शंकर डोमकावळे, संपत सायकड, किशोर भोपळे, राजेंद्र धोंडे, कृष्णा भोपळे, गणेश धोंडे, सानप सर, ग्रामपंचायत सदस्य शरद धनवडे, साईनाथ धोंडे, सुजित धोंडे आदींनी पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

# स्वारातीम विद्यापीठातील नाट्य विभागाने जिंकली प्रेक्षकांची मने

## थिएटर हाऊसफुल्ल, तो ती मनोहर नाटकाला प्रचंड प्रतिसाद



नांदेड /जिल्हा प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात पार पडली. दि.१६ नोव्हेंबरला सुरुवात झालेल्या या स्पर्धेची सांगता दि.२७ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ललित व प्रयोगजीवी कला संकुलातील नाट्य व चित्रपट विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नाटकाने झाली. विद्यार्थी लेखक व दिग्दर्शक अतुल साळवे यांच्या तो ती आणि मनोहर या नाटकाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. अक्षरशः शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह हाऊसफुल्ल झाले. बसायला जागा कमी पडत असतानाही काही प्रेक्षकत हे पायऱ्यावर तर काही उभे राहून नाट्यानुभव घेत असल्याचे चित्र यावेळी बघायला मिळाले. नाटकातील उत्कट प्रसंगांना, संवादाला, अभिनयाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी भरभरुन दाद दिली. विद्यापीठातील नाटच व चित्रपट विभागातील एम. ए. नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी संचालक डॉ पृथ्वीराज तौर व नाट्य व चित्रपट विभागाचे प्रा. राहुल जयप्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या नाटकाची निर्मिती केली आहे.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ अशोक महाजन, कुलसचिव डॉ डी.डी.पवार, संचालक डॉ पृथ्वीराज तौर, डॉ. पी. विठ्ठल व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही नाटकाला उपस्थित राहुन विद्यार्थी कलावंतांचा उत्साह वाढवला. विजय गजभारे, सपना वाघमारे, मानसी बेलापुरकर, राहुल मोरे, चंद्रकांत

तोरणे, करन गुडेवार यांनी आपल्या कसदार अभिनयाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.

तो ती मनोहर या नाटकाचे लेखन-दिग्दर्शन- विद्यार्थी अतुल साळवे यांनी केले, तर निर्मीती प्रमुखाची जबाबदारी नाट्य विभागातील प्रा. राहुल गायकवाड यांनी सांभाळली.

या नाटकाची प्रकाश योजना - माणिकचंद थोरात, रंगभूषा - सौ द्वारका साळवे, वेशभूषा- कांचन वसेकर, नेपथ्य- राहुल गायकवाड व संगीत अतुल साळवे यांनी केले, तर मंच व्यवस्थापनाची जबाबदारी नागेश सोनकांबळे, रोहन पंडित, अमित सोनकांबळे, निलेश गच्चे, अजिंक्य जाधव, सुनिल ममदापुरे, सचिन थोटे, सुमित सोळंके, गजेस्विनी देलमाडे यांनी पार पाडली.



# २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव - २०२५

## मा. राजभवन स्पर्धा निरीक्षण समितीचे विद्यापीठात परीक्षण

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या भव्य क्रीडा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या स्थापन करून तयारी जोरात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर आज दि. २८ नोव्हेंबर रोजी मा. राज्यपाल नियुक्त मा. राजभवन स्पर्धा परीक्षा निरीक्षण समितीने विद्यापीठाच्या क्रीडा सुविधांचे निरीक्षण केले. समितीने विविध विभागांकडून अद्यावत माहिती घेत संपूर्ण तयारीचे परीक्षण केले. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दापोली येथील डॉ. अरुण माने, तर सदस्य म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सचिन देशमुख आणि मुंबई येथील आदित्य कुलकर्णी उपस्थित होते.


विद्यापीठातील क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी समितीसमोर क्रीडा महोत्सवाच्या तयारीचा विस्तृत आढावा सादर केला.

या क्रीडा महोत्सवात कब्बडी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि थलेटिक्स यासारख्या विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून, राज्यभरातील विद्यापीठांमधून अंदाजे ५००० खेळाडू सहभागी होणार आहेत. अशा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत कुलगुरू डॉ. चासकर आणि क्रीडा संचालक डॉ. माने यांनी व्यक्त केले आहे.

क्रीडांगणे अद्ययावत करण्यासाठी कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर यांच्यासह डॉ. मनोज पैजने, हिरामण वाघमारे, राजासाहेब बोराळे, अरुण इंगोले, केशव कल्याणकर, प्रदीप बिडला तसेच विविध समित्यांचे अध्यक्ष, सदस्य,

# अवैध रित्या रेती उपसा करणाऱ्या ८ घाटावर एकाच दिवशी छापा टाकून ग्रामीण पोलीसांची कारवाई

## ३७ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त



नांदेड :- गोदावरी नदी पात्रात बोटीच्या साह्याने फिरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कंड, पिंपळगाव, भनगी, वाहेगाव आणि गंगाबेट . या परिसरात छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा कारवायांचा पर्दाफाश केला. या मोहिमेत एकूण ३७ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून काही साहित्य शासनाच्या नियमांनुसार नष्ट करण्यात आले आहे.

पोलिस अंमलदार शंकर माळगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज सकाळी नऊ वाजता नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक नदीपात्रात कारवाईसाठी रवाना झाले. या पथकात ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, तसेच पोलीस अंमलदार मुंडे, श्याम भोसले, शेख, शंकर माळगे, सिरमलवार, चावरे, शेख जमीर, शेख आसीफ . धम्मपाल कांबळे . लव्हारे आदी नी या कारवाईत सामावेश होते .

पथकाने कल्लाळ परिसरातून बोटीच्या साह्याने नदिपात्रातील लपवुन ठेवलेले साहित्य मिळण्यासाठी गस्त घालून अनेक ठिकाणी धाड टाकुन तेथे अवैध रित्या रेती उपसा होत असल्याचे निर्दशनास आले असता त्या ठिकाणी धाडी टाकून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला यात

१० ब्रास रेती किंमत ५० हजार रुपये ५४ तराफे किंमत २७ लाख

३ इंजिन किंमत ९ लाख

१२ लोखंडी ड्रम किंमत १२ हजार १५ प्लास्टिक ड्रम किंमत ९ हजार १७ लोखंडी पाईप किंमत ५१ हजार असा एकुण ३७ लाख २२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला तर काही शासनाच्या नियमप्रमाणे जागेवर नष्ट करण्यात आला असून या प्रकरणात अरोपी संतोष हंबर्डे रा विष्णुपूरी त्यांच्या सोबत संजीवन बिन हारून बिन व वकील मिश्री साहनी यासह इतर तिन जणावर गुन्हा क्र ११३५ / २०२५ प्रमाणे नोंदवण्यात आला आहे या कारवाई बद्दल पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधिक्षक प्रशांत शिंदे यांनी ग्रामीण पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर व कर्मच्यारी यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे

# विविध मागण्यासाठी खा. अशोकराव चव्हाण यांच्या कडे साकडे

पिपंळगाव येथील गावकऱ्यांनी केली निवेदनात मागणी.

तामसा प्रतिनिधी नगरपंचायत हिमायतगर च्या भाजपा उमेदवार साठी प्रचारात जातं असताना श्री क्षेत्र पिपंळगाव येथे माजी मुख्यमंत्री व राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी नियोजित भेटी दरम्यान गावकऱ्यांनी आपल्या गावात स्वास्थ सुविधा, शिक्षण सुविधा, सडक असं मूलभूत सुविधे संदर्भात निवेदन देऊन साकडे घातले. मार्च २०२५ला पिपंळगाव येथे श्री दत्त मंदिरात मोठ्या थाटात पार पडलेल्या श्री शिव महापुराण कथा व १०८ कुंडी विश्वशांती महा यज्ञ



अलौकिक सोहळा संपन्न झाला होता त्यावेळेस हा तीर्थक्षेत्र गावात महाराष्ट्र राज्य सह तेलंगाना, कर्नाटक,आंध्र प्रदेश येथून लाखो भक्तांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविल्या होता एवढा मोठा अलौकिक प्राप्त गावच्या विकास शून्य आहे गावची लोकसंख्या ३ हजार च्या जवळ पास असून गावात प्राथमिक उपचारासाठी १५किमी, तर मुलींना माध्यमिक शिक्षण साठी तामसा १२ किमी, पर्यायी सडक सुविधा नसल्याने महामंडळ च्या एसटी बस येत नाही त्या संदर्भात गावात विकासाचा भर पडावा म्हणून गावकऱ्यांनी निवेदन द्वारे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांना स्वास्थ्य सुविधे साठी प्राथमिक उप स्वास्थ्य केंद्र, शिक्षण संदर्भात मुलांना माध्यमिक शिक्षण साठी वर्गवाढ, पांदन रस्ते दुरुस्त करून, विधुत पुरवठा असे अनेक मूलभूत सुविधा पासून वंचित राहिलेल्या या तीर्थक्षेत्र गावचा विकास विकास वाहवा म्हणून गावकऱ्यांना निवेदन देऊन साकडे घातले या निवेदनावर डॉक्टर रामेश्वर भाले,डॉक्टर किरण भाले,माजी सरपंच मनोहर खांडरे,सरपंच शंकर आडे, नामदेव चव्हाण,गणेश जाधव,बाबुराव जाधव नारायणहमंद,सह गावाकऱ्यांचा सर्वांकसऱ्या होते.

# हदगाव तालुक्यातील ग्रामसेवकांचा गलथान कारभारास जनता वैतागली..

## गटविकास अधिकारी यांची ग्रामसेवक, कंत्राटी, रोजगार सेवकांवर वचक नाही ?

तामसा /प्रतिनिधी

हदगाव तालुक्यात एकूण १२५ ग्रामपंचायत च्या कार्यभार १०८ ग्रामसेवकांवर असल्याकारणाने नेमून दिलेल्या गावात ग्रामसेवक हजर राहत नसल्याने सर्व सामान्य जनतेची कामे वेळेवर होत नसल्याची तक्रार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावळी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामसेवक कर्मचारी हे हदगाव, तामस्यात, पंचायत समितीत बसून कारभार पाहत आहेत तर काही ग्रामसेवक हे जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असल्याने ठराविक दिवस बघून येणं जाण (अपडाऊन)करतात मुख्यालय राहणं बंधनकारक असून अथवा ग्रामपंचायत कार्यालय जाऊन उपस्थिती राहणं असून हे कामचुकार अधिकारी यांच्यावर गट विकास अधिकारी यांची कसलीच वचक नसल्या मुळे अधिकारी यांची मनमानी कारभार झाला असून ''तेरी भी चूप मेरी भी चूप'' असल्याचे दिसी येते त्यामुळे ग्रामीण भागातल्या सर्वसामान्य नागरिकांना अनेक समस्या निर्माण होत आहेत. नमुना नंबर ८, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, सह विविध प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सामान्य जनतेला हदगावला, तामसाला यावे लागत आहे. सदरील ग्रामसेवक हे नेमून दिलेल्या गावात नियमित येत नसल्यामुळे अनेकांना तर आपला गावचा ग्रामसेवक

कोण आहे? याची विचारणा करावी लागत आहे. संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. हदगाव पंचायत समितीला आठवड्यातून एक वेळा ग्रामसेवक स् कर्मचारी आढळून येतात दौऱ्याच्या नावाखाली त वैयक्तिक कामाकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते. एका ग्रामसेवकाकडे अधिक ग्रामपंचायतचे प्रभार असल्याने कामानिमित्त फोन लावल्यास उडवा उडवीचे उत्तरे भेटतात विविध योजनेची माहिती ग्रामसेवकाकडून गावातल्या नागरिकांपर्यंत मिळत नसल्यामुळे विविध योजना पासून सामान्य नागरिकांना वंचित राहावे लागत आहे. संबंधित गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांचे आर्थिक हितसंबंध असल्यानेच ग्रामसेवक आपल्या मर्जीनुसार सेवा बजावत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून कामचुकार ग्रामसेवकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांमधून होत आहे.मागील दोन महिन्यापूर्वी आमच्या दैनिकात पंतप्रधान आवास योजनेत लूट बातमी प्रकाशित करून गट विकास अधिकाऱ्याचे लक्ष वेधले होते त्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक २१ रोजी ग्रामपंचायत कार्यालय तामसा येथे अचानक भेट झाल्याने गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांच्याशी संवाद झाल्याने अधिकाऱ्यांनी ''हो तक्रारी च्या आधारे एका कंत्राटी

# तिरंगी संघर्षात कंधार तापल

# मतदार शांत, नेते अस्वस्थ

## स्थानिक प्रश्न व जातीय समीकरणांचा प्रभाव ; कंधारमध्ये लढत अधिक चुरशीची

कंधार /प्रतिनिधी

कंधार नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस वाढत असून शहरात गुप्त बैठकांचा आणि सेटलमेंटच्या हालचालींचा जोर चांगलाच वाढला आहे. कोणत्या गटाच्या समीकरणांना फायदा होणारा आणि कोणाचा डाव उलटणार, हे चार दिवसांत स्पष्ट होणार आहे.

काँग्रेस पक्ष,भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने आल्याने यंदाची निवडणूक चुरशीची बनली आहे. अनेक प्रभागांत तिरंगी तर काही ठिकाणी चौरंगी लढतीची स्थिती निर्माण झाली आहे. मतांची विभागणी स्पष्ट दिसत असल्याने सर्व पॅनल समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि प्रभागातील इच्छुकांनी घराघरांत जाऊन जनसंपर्काचा धडाका सुरू ठेवला आहे. मात्र, मतदारांची नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस वाढत असून शहरात गुप्त बैठकांचा आणि सेटलमेंटच्या हालचालींचा जोर चांगलाच वाढला आहे. कोणत्या



गटाच्या समीकरणांना किती फायदा होणार आणि कोणाचा डाव उलटणार, हे येत्या ३ तारखेला स्पष्ट होणार आहे.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि प्रभागातील नगरसेवकांनी घराघरांत जाऊन जनसंपर्काचा धडाका सुरू ठेवला आहे. मात्र, मतदारांची शांतता उमेदवारांना अधिक अस्वस्थ करत आहे. मतदार कोणत्या दिशेने झुकले आहेत याचा अंदाज न लागल्याने पॅनल प्रमुखांनी उमेदवारांना प्रभागातच थांबून प्रचार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

स्थानिक प्रश्न आणि उमेदवारांचे व्यक्तिमत्त्व हेच निर्णायक घटक ठरणार असल्याचे चित्र शहरात आहे. सध्या शहरातल्या प्रत्येक गल्ली बोळात निवडणुकीचे वातावरण तापलेले असतानाच राजकीय समीकरणे दर तासाला बदलत आहेत. त्यामुळे कोणत्या पॅनलचे पारडे जड होईल हे सांगणे कठीण झाले आहे.निवडणुकीचा अस्सल संगम तयार

विकास,कामे आणि आश्वासने याच्यापलीकडे जाऊन ही निवडणूक अंतर्गत नाराजी,राजकीय मैत्री, समाजनिहाय मते, स्थानिक वाद आणि गुप्त राजकीय डावपेच यांचा संगम बनली आहे. हा संगम आपल्या बाजूने फिरवण्यासाठी सर्व पॅनल शक्य ते सर्व प्रयत्न करत असून कंधारमधील राजकीय तापमान दिवसेंदिवस चढत असल्याचे चित्र आहे.

जाती निहाय मतांच्या समीकरणात उलथापालथ या निवडणुकीत समाजनिहाय मतांचे गणित स्पष्टपणे जाणवत आहे. कोणत्या समाजाचे किती मते, त्या समाजातील प्रभावशाली व्यक्ती कोण, आणि त्यांना आपल्या बाजूला वळवण्याची धडपड पॅनलच्या नेत्यांनी सुरू केली आहे. काही प्रभागांत समाजातील मतांची विभागणीही जाणवू लागली आहे. याचा कोणाला फायदा होणार आणि कोणाला फटका बसणार, हे अद्याप अनिश्चित आहे.



# मुखेडच्या विकासासाठी आश्वासन नाही वचन देतो... खा. श्रीकांत शिंदे.

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड शहराचा विकास करावयाचा असेल तर शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. विजया देबडवार व युतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतानी विजयी करा, शहराच्या विकासासाठी आश्वासन नाही तर वचन देतो असे प्रतिपादन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. ते आज मुखेड नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर आ हेमंत पाटील, आ. बोंढारकर, माजी आमदार सुभाष साबणे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, माधव दादा जमदाडे,शिवसेना जिल्हा प्रमुख उमेश मुंडे आदीची उपस्थिती होती. खा. श्रीकांत शिंदे म्हणाले की, येथील कामगार, मजूराच्या हाताला काम मिळण्यासाठी येथे एमआयडीसीची गरज आहे, या खात्याचे मंत्री शिवसेनेचे मंत्री उदय सामंत हे आहेत, त्यांना सागून लवकरच हा प्रश्न निकाली काढू. बजरगनगर येथील हद्दवाढीचा प्रश्न सुद्धा निकाली काढण्यात येईल यासाठी लाडक्या बहिणीनी विधानसभेला जसे बहुमताने निवडूण दिले त्याच प्रकारे नगर पालिकेच्या निवडणुकीत सुद्धा शिवसेना युतीच्या सर्व उमेदवारांना निवडून देऊन येथे सत्ता परिवर्तन करावे असे आवाहन खा. शिंदे यांनी केले. प्रास्ताविकात टि. व्ही. सोनटक्के सरांनी शहरातील बकाल रस्ते, कचरा कुडी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, आदी स्थानिक प्रश्न उपस्थित करून आ. राठोड यांच्यावर टिका केली.